एमपीएससी मंत्र

रोहिणी शहा

निर्णयक्षमता - पर्याय विश्लेषण आणि श्रेणीकरणाचा सराव

सी सॅटमधील निर्णय क्षमता आणि व्यवस्थापन कौशल्ये या घटकाची तयारी कशी करावी याबाबत मागील लेखामध्ये चर्चा करण्यात आली. या चर्चेच्या अनुषंगाने या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरे कशा प्रकारे शोधता येतील याबाबत एका प्रश्नाच्या माध्यमातून या लेखामध्ये चर्चा करण्यात येत आहे.

''राज्यामध्ये प्लॅस्टिक बंदी लागू करण्यात आली आहे. प्लॅस्टिकचा वापर करताना आढळल्यास रु. २००० इतक्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. पण काही फेरीवाले, भाजीवाले असे किरकोळ माल विकणारे लोक अजूनही प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करताना तुम्हाला आढळले आहेत. याबाबत त्यांना हटकले असता ग्राहकांकडून सामान ठेवण्यासाठी पिशव्यांची मागणी होत असल्याचे आणि बाजारात उपलब्ध पर्यायी पिशव्यांचे दर त्यांना परवडत नसल्याने प्लॅस्टिकचाच वापर करणे अपरिहार्य असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तुम्ही त्यांना अशा उल्लंघनासाठी होणाऱ्या दंडाची बाब बोलून दाखविली असता संबंधित अधिकाऱ्यास 'काहीतरी' देऊन सुटका करून घेता येते, असेही त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. तुम्ही.....'।

१. रद्दी आणि चिंध्यांपासून कमी किमतीच्या पिशव्या बनविण्याचा व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांच्यामधीलच काहींना मदत आणि मार्गदर्शन कराल आणि प्लॅस्टिकचा वापर थांबवण्याची त्यांना विनंती कराल.
२. ग्राहकांना प्लॅस्टिकवर बंदी असल्याचे सांगून प्लॅस्टिकची पिशवी देता येणार नाही हे स्पष्टपणे सांगण्याची विनंती विक्रेत्यांना कराल.
३. प्लॅस्टिक वापरणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाकडे तक्रार कराल आणि त्याच्यावर कारवाईची मागणी कराल.
४. स्थानिक प्रशासनाकडे या विक्रेत्यांबाबत लेखी तक्रार नोंदवाल आणि शासनाने अशा विक्रेत्यांना बाजारात उपलब्ध पर्यायी पिशव्या कमी दराने उपलब्ध करून देण्याची विनंती कराल.

नेमकी समस्या :

ग्राहक आणि विक्रेत्यांकडून प्लॅस्टिकचा बेकायदा वापर, पर्यायी व्यवस्था विक्रेत्यांना न परवडणारी, संबंधित अधिकारी कायद्याची अंमलबजावणी न करणारा व भ्रष्ट

तुमची भूमिका :

एक जागरूक नागरिक

पर्यायांचे विश्लेषण :

या उदाहरणातील पर्याय पाहिल्यास दुसरा पर्याय कोणत्याही प्रकारे प्रभावी नाही. प्लॅस्टिक बंदीची बाब ग्राहकांना माहीत नाही म्हणून ते प्लॅस्टिकच्या पिशव्या मागतात असे नाही. तसेच ग्राहकांची मागणी नाकारण्याइतका फेरीवाले वा भाजीवाल्यांचा व्यवसाय स्थिर नसतो. त्यामुळे याबाबत संवेदनशीलपणे विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्राहकांची मागणी नाकारण्याबाबत अशा छोट्या विक्रेत्यांना आग्रह करणे फारसे परिणामकारक ठरणार नाही. या पर्यायातून तुम्ही कोणतीही जबाबदारी पार पडताना दिसत नाही, तसेच कोणताच तोडगाही निघत नाही. तसेच एक जागरूक नागरिक म्हणून प्लॅस्टिक वापरापासून विक्रेत्यांना परावृत्त करणे हा परिणामही साधता येत नाही. उलट ती जबाबदारी विक्रेत्यांवर टाकून मोकळे होण्याची वृत्ती यामधून दिसते. त्यामुळे या पर्यायास शून्य गुण देण्यात येतील.

आता उरलेल्या पर्यायांमधून अधिक समर्पक व या समस्येवर अंतिम आणि दूरगामी तोडगा निघू शकेल असा पर्याय निवडणे आवश्यक ठरते.

पर्याय चार हा कृतिशील वाटतो. कायद्याच्या विरोधात जाऊन केल्या जाणाऱ्या प्लॅस्टिक वापराबाबत शासनाकडे तक्रार करणे ही योग्य बाब आहे. त्यातून काही विक्रेत्यांवर कारवाई होऊ शकेल. मात्र अशा कारवाईनंतरही प्रशासनाच्या अपरोक्ष आणि ग्राहक टिकविण्यासाठी लपूनछपून प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर सुरू राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच शासन कल्याणकारी भूमिकेतून जीवनावश्यक वस्तूंचा आवश्यकतेप्रमाणे पुरवठा करू शकते. मात्र महाग पर्यायी पिशव्या नागरिकांना स्वस्तामध्ये पुरविणे ही शासनाची जबाबदारी होऊ शकत नाही, हे लक्षात आले पाहिजे. सर्व काही शासनाने करावे ही वृत्ती व अपेक्षा यातून दिसून येते. त्यामुळे योग्य वाटला तरी हा पर्याय व्यवहार्यही नाही आणि दूरगामी परिणाम करणाराही ठरत नाही. म्हणून या पर्यायास दीड गुण देण्यात येतील.

तिसरा पर्याय संबंधित अधिकाऱ्यावर कायदेशीर कार्यवाहीचा उपाय सुचवतो. अशा प्रकारे लाच घेणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई होणे योग्यच आहे. पण त्यातून नेमक्या समस्येचे निराकरण होताना दिसत नाही. अधिकारी बदलला तरी नव्या अधिकाऱ्याच्या अपरोक्ष प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर होणारच नाही याची खात्री देता येत नाही. त्यामुळे योग्य असला तरी हा पर्याय मूळ समस्येबाबत परिणामकारक ठरेलच असे नाही. त्यामुळे या पर्यायास दोन गुण देण्यात येईल.

पर्याय एक हा समस्येवरचा दूरगामी तोडगा आहे. यातून पर्यायी महाग पिशव्याऐवजी पर्यावरणस्नेही अशा कागदी व कापडी पिशव्यांचा वापर सुरू होऊ शकतो. अशा स्वस्त पिशव्या बनवणे हा रोजगाराचा नवीन स्रोत ठरू शकतो. आणि त्यासाठी मदत, मार्गदर्शन करण्याच्या तुमच्या विचारातून तुमची सकारात्मक वृत्ती आणि संवेदनशीलता दिसून येते. या माध्यमातून कोणतीही जबरदस्ती न करता ग्राहक आणि विक्रेत्यांच्या सवयीमध्ये बदल घडून येऊ शकतो. थोडक्यात यामध्ये समतोल व व्यवहार्य दृष्टिकोन, निर्बल समाजघटकांविषयी तसेच पर्यावरणीय संवेदनशीलता आणि कृतिशीलता असे तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू दिसून येतात. त्यामुळे पर्याय एकला अडीच गुण देण्यात येतील.

यूपीएससीची तयारी

- प्रवीण चौगले

केंद्रीय कार्यकारी मंडळ



प्रस्तुत लेखामध्ये यूपीएससी मुख्य परीक्षेतील सामान्य अध्ययन पेपर २ मधील राज्यव्यवस्था व राजकीय या प्रक्रिया घटकांतर्गत आपण केंद्रीय कार्यकारी मंडळाविषयी जाणून घेणार आहोत. राज्यघटनेतील कलम ५२ ते ७८ मध्ये केंद्रीय कार्यकारी मंडळाबाबत तरतूद आहे. भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केल्याने राज्यव्यवस्थेमध्ये राष्ट्रपती हा घटनात्मक तर पंतप्रधान हा वास्तविक प्रमुख आहे. दोन्ही व्यक्ती लोकनियुक्त असतात. तथापि, त्यांच्या निवडणूक पद्धती वेगळ्या आहेत. पंतप्रधान एका मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात, तर राष्ट्रपती अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडून येतात. संसदीय व्यवस्थेत सर्व घटनात्मक अधिकार राष्ट्रपतींकडे असतात मात्र, प्रत्यक्षात हे अधिकार पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ उपभोगत असतात.



सर्वप्रथम आपण राष्ट्रपतीपदाविषयी थोडक्यात जाणून घेऊ. राज्यघटनेतील कलम ५२ मध्ये राष्ट्रपतीपदाबाबत तरतूद आहे. राष्ट्रपतीपदाचे अध्ययन परीक्षेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. यामध्ये राष्ट्रपतीपदाची निवडणूक, राष्ट्रपतींचे अधिकार व कार्य, राष्ट्रपतींना असणारा नकाराधिकार, वटहुकुमाचा अधिकार, दयेचा अधिकार इत्यादी बाबी ज्ञात असाव्यात. तसेच राष्ट्रपतींचे स्थान व भूमिका याविषयी माहिती घ्यावी. २०१४च्या मुख्य परीक्षेमध्ये राष्ट्रपतींच्या दयेच्या अधिकारावर प्रश्न विचारण्यात आला. सदर प्रश्नास समकालीन घडामोडींची पार्श्वभूमी होती.

Q. instances of presidentl s delay in commuting death sentences has come under public debate as denial of justice. Should there be a time limit specified for the president to accept/ reject such a petitions? Analyse. (200 words).

भारतीय संविधानामध्ये राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत त्या पदाच्या जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी उपराष्ट्रपतीपदाची तरतूद केली आहे. राष्ट्रपतींप्रमाणेच उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक, त्यांचे अधिकार इ. बाबी जाणून घ्याव्यात. तसेच, उपराष्ट्रपतीपदावर असणारे काही आक्षेपही आपल्याला माहीत असणे आवश्यक ठरते. उदा. उपराष्ट्रपतीच्या निवडणूक प्रक्रियेशी राज्यांचा कोणत्याही प्रकारे संबंध नसतो, उपराष्ट्रपती राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असल्यामुळे या सभागृहाला आपला अध्यक्ष निवडण्याचा लोकशाही हक्क नाकारला आहे. इ.

भारतातील संसदीय शासनपद्धती ब्रिटिशांच्या शासनपद्धतीवर आधारित आहे. यात पंतप्रधानपद महत्त्वाचे असते. कलम ७४नुसार, राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असेल. या कलमानुसार मंत्रिमंडळात पंतप्रधानांचे स्थान सर्वोच्च असते, हे स्पष्ट होते. संसदीय शासनपद्धतीमध्ये बहुमत मिळालेल्या पक्षाच्या नेत्याला पंतप्रधान केले जाते. पंतप्रधानांची नेमणूक जरी राष्ट्रपती करत असले तरी इतर मंत्र्यांची नेमणूक पंतप्रधानांच्या सल्ल्याने केली जाते. संसद, राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणून पंतप्रधान महत्त्वाची भूमिका पार पाडतात. पंतप्रधान हे विविध भूमिका पार पाडतात. जसे मंत्रिमंडळ प्रमुख, लोकसभेचे नेते तसेच पंतप्रधान परराष्ट्र धोरण ठरवणे, देशाचे मुख्य प्रशासक म्हणून त्यांना प्रशासनावर लक्ष ठेवावे लागते.

भारतीय घटनेतील कलम ७४ मंत्रिमंडळाच्या दर्जाशी संबंधित आहे तर कलम ७५ हे मंत्र्यांची नियुक्ती, कार्यकाळ, जबाबदारी, पात्रता, शपथ, वेतन आणि भत्ते या घटकांशी संबंधित आहे. पंतप्रधानांच्या सल्ल्याने राष्ट्रपती मंत्र्यांची निवड करत असतात. संसदेचा सदस्य नसलेल्या व्यक्तीची देखील मंत्रिपदी निवड केली जाऊ शकते. संसदीय शासनपद्धतीत मंत्रिमंडळ सामूहिकपणे लोकसभेला जबाबदार असते. लोकसभेने संपूर्ण मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव संमत केला तर सर्व मंत्र्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो. मंत्रिमंडळाच्या रचनेत तीन प्रकारचे मंत्री म्हणजे - १) कॅबिनेट मंत्री, २) राज्यमंत्री आणि ३) उपमंत्री असतात. कॅबिनेट मंत्री म्हणजे खात्याचा प्रमुख. कॅबिनेट म्हणजे अतिशय महत्त्वाचे निर्णय घेण्याची यंत्रणा असते यात निवडक मंत्री असतात. ते स्वतंत्रपणे आपापल्या खात्यांचा कारभार करतात. राज्यमंत्री हा मंत्रिमंडळाचा दुसरा स्तर असतो. ते कॅबिनेट मंत्र्यांना साहाय्य करतात. जर एखादे खाते मोठे असेल तर त्या खात्याच्या राज्यमंत्र्यावर एखाद्या विभागाची स्वतंत्र जबाबदारी दिली जाते. उपमंत्री हा मंत्रिमंडळाचा तिसरा स्तर असतो. ते कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्र्यांना मदत करतात. भारतीय राज्यघटनेत ४२वी घटनादुरुस्ती (१९७८) होईपर्यंत कॅबिनेट या शब्दाचा उल्लेख नव्हता. तोपर्यंत मंत्रिमंडळ असाच उल्लेख केला जात होता. हा घटक परीक्षेकरिता महत्त्वाचा आहे कारण पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ म्हणजेच शासनाची कार्यकारी सत्ता चालविणारी महत्त्वाची संरचना आहे. त्याचप्रमाणे शासनाची ध्येयधोरणे ठरविण्यात, त्यांची अंमलबजावणी करण्यात पंतप्रधान व त्यांच्या कॅबिनेटला साहाय्य करण्याबरोबरच त्यांच्या धोरण निर्मितीवर प्रभाव पाडणारे घटक म्हणून किचन कॅबिनेट, कॅबिनेट सचिव, कॅबिनेट समित्या, पंतप्रधानांचे कार्यालय या संस्थांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. २०१४ साली मंत्रिमंडळाच्या कॅबिनेटच्या आकारासंबंधी एक प्रश्न विचारला गेला.



Q. The size of the cabinet should be as big as governmental work justifies and as big as the Prime Minister can manage as a team. How far is the efficacy of a government then inversely related to the size of the cabinet? Discuss. (200 words).

कार्यकारी मंडळ या घटकाची तयारी 'भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया (खंड १)' (तुकाराम जाधव आणि महेश शिरापूरकर) व इंडियन पॉलिटी (एम. लक्ष्मीकांत) या संदर्भग्रंथांमधून करावी. याबरोबर कार्यकारी मंडळाशी संबंधित समकालीन घडामोडींकरिता नियमितपणे वृत्तपत्रांचे व ह्योजनाह्न आणि EPW इत्यादी मासिकांचे वाचन करावे.

एमपीएससी मंत्र

दुय्यम सेवा मुख्य परीक्षा संयुक्त पेपर

रोहिणी शहा

दुय्यम सेवा (गट ब) मुख्य परीक्षा ९ जुलैपासून सुरू होत आहे. या लेखापासून मुख्य परीक्षेच्या तयारीबाबत चर्चा करण्यात येईल.

मुख्य परीक्षेमध्ये पेपर एक हा तिन्ही पदांसाठी संयुक्त पेपर आहे आणि पेपर दोन हा सामान्य क्षमता चाचणी आणि त्या त्या पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानावर आधारित वेगळा अभ्यासक्रम यांवर आधारित असेल.

एकूण दोनशे गुणांसाठी होणाऱ्या मुख्य परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या दोन प्रश्नपत्रिका असतात व त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असते. (सोबत तक्ता)

या लेखामध्ये संयुक्त पेपरच्या तयारीबाबत चर्चा करण्यात येत आहे. तर पदनिहाय पेपरच्या तयारीबाबत स्वतंत्रपणे चर्चा करण्यात येईल.

पेपर क्र. व संकेतांक	विषय	गुण	प्रश्न संख्या	दर्जा	माध्यम	कालावधी
१ (तिन्ही पदांसाठी संयुक्त पेपर)	मराठी	५०	५०	बारावी	मराठी	एक तास
	इंग्रजी	३०	३०	पदवी	इंग्रजी	
	सामान्यज्ञान	२०	२०	पदवी	मराठी - इंग्रजी	
२ (पदनिहाय स्वतंत्र पेपर)	सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान	१००	१००	पदवी	मराठी - इंग्रजी	एक तास

पेपर १ (संयुक्त पेपर) तयारी

मराठी व इंग्रजी

- या पेपरच्या अभ्यासक्रमाचे व्याकरण, म्हणी-वाक्प्रचार आणि आकलन असे ढोबळमानाने तीन भाग दिसून येतात. व्याकरणावरील प्रश्नांची तयारी करताना दोन्ही भाषांच्या व्याकरणाचे नियम समजून घेणे सगळ्यात महत्त्वाचे आहे. अभ्यासक्रमामध्ये संधी, समास, अलंकार, शब्दरचना, काळ, वाक्य पृथःकरण अशा बाबींचा स्वतंत्र उल्लेख केलेला नाही. मात्र त्यांवर प्रश्न विचारण्यात आले आहेत. त्यामुळे व्याकरण या व्याख्येत जे येते त्याबाबत आपल्याला माहिती असणे आणि ही माहिती नेमकी व अचूक असणे हे प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक आहे.
- मराठीतील विभक्ती प्रत्ययांचे कोष्टक, सामासिक शब्दांची उकल, महत्त्वाचे तत्सम, तद्भव आणि देशी शब्द पाठ करावेत आणि त्यांचे नियम व्यवस्थित समजून घ्यावेत. इंग्रजीमधील काळ व प्रयोगांच्या वाक्यरचनेचा टेबल, तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय पुरुषी वाक्यांसाठीचे कोष्टक आणि महत्त्वाच्या क्रियापदांची past participle, past perfect participle यांचे कोष्टक पाठच असायला हवेत. वाक्यरचनेचे नियम पक्के माहीत असतील तर वाक्य रूपांतरणाचे प्रश्न नक्कीच सोडवता येतात. शब्दरचनेचे मराठीतील नियमही माहीत असणे आवश्यक आहे.
- तयारीच्या काळात अवांतर वाचनासाठी वेळ काढणे काही वेळेस शक्य होत नाही. अशा वेळी म्हणी, वाक्प्रचार यांचे संकलन असलेले छोटेसे पुस्तक किंवा प्रिंटआऊट सोबत बाळगावे. अधूनमधून त्यातील म्हणी, वाक्प्रचार वाचून त्यांचा अर्थ समजून घ्यावा. अर्थाची उकल झाली की त्यांचा उदाहरणांमध्ये वापर करणे किंवा केलेला वापर योग्य आहे की नाही हे कळणे सोपे होते.
- आकलनासहित वाचन आणि नियमांचा सराव अशी रणनीती या घटकाच्या तयारीसाठी योग्य ठरेल.

सामान्यज्ञान :

चालू घडामोडी जागतिक तसेच भारतातील

चालू घडामोडींच्या नोटस् सूत्रबद्धपणे पुढीलप्रमाणे काढता येतील - केंद्र व राज्य सरकारच्या योजना, धोरणे व त्यातील महत्त्वाचे मुद्दे, देशावर प्रभाव टाकू शकणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या घटना, ठळक पर्यावरणीय व भौगोलिक घटना, त्याबाबतचे निर्णय, अर्थव्यवस्था व राज्यव्यवस्थेसंबंधी घडामोडी, विज्ञान तंत्रज्ञानविषयक घडामोडी, महत्त्वाच्या परिषदा, संघटना, चर्चेतील व्यक्ती, त्यांचे कार्यक्षेत्र, नियुक्त्या-निवड-बढती, पुरस्कार, सन्मान, पारितोषिके, ग्रंथ लेखक, निधन, महत्त्वाच्या चर्चेतील कंपन्या, संस्था, त्यांचे प्रमुख, त्यांचे उत्पादन क्षेत्र, चर्चेतील ठिकाणे, विज्ञानातील शोध व त्यातील संकल्पना, महत्त्वाच्या समित्या-आयोग व त्यांचे अहवाल, महत्त्वाची आर्थिक आकडेवारी, महत्त्वाची विधेयके, कायदे व घटनादुरुस्त्या, महत्त्वाचे न्यायालयीन निवाडे इ.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

दोन्ही अधिनियमांतील महत्त्वाच्या व्याख्या, तरतुदी, विहीत कालावधी, सेवा/ माहिती देणारे व अपीलीय प्राधिकारी यांचे अधिकार, कर्तव्ये, नियमांतील अपवाद, दंडांची/ शास्तीची तरतूद या बाबी मुख्य अधिसूचनेतून आणि नियमांतून तयार कराव्यात.

संगणक व माहिती तंत्रज्ञान

आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा-सुविधा मिळविण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मूलभूत प्रश्न व त्यांचे भवितव्य या बाबींची तयारी संदर्भ साहित्यासहित वृत्तपत्रीय चर्चेतून अपडेट कराव्यात.

डेटा कम्युनिकेशन, नेटवर्किंग आणि वेब टेक्नॉलॉजी यातील महत्त्वाच्या संज्ञा व संकल्पना समजून घ्याव्यात आणि थोड्क्यात प्रणालीची माहिती करून घ्यावी. शासनाचे कार्यक्रम जसे मीडिया लॅब एशिया, विद्यावाहिनी, ज्ञानवाहिनी, सामूहिक माहिती केंद्र इत्यादी बाबी उद्देश, प्रक्रिया, लाभार्थी यांचा आढावा घ्यावा.

सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध याबाबतचे कायदे मुळातून वाचून त्यांची तयारी करावी.

यूपीएससीची तयारी

न्यायव्यवस्था

- प्रवीण चौगले

प्रस्तुत लेखामध्ये यूपीएससी मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन पेपर दोनमधील न्यायव्यवस्था या घटकावर चर्चा करणार आहोत. भारतीय संविधानाने देशात संघराज्य पद्धती प्रस्थापित केली आहे तरीही देशात संघराज्य आणि घटक राज्यांची वेगळी न्यायालयव्यवस्था न स्वीकारता एकेरी व एकात्म स्वरूपाची न्यायव्यवस्था स्वीकारण्यात आली. देशात एकात्मता वाढावी हा त्यामागे उद्देश होता. भारतीय न्यायव्यवस्थेमध्ये सर्वोच्च स्थानी सर्वोच्च न्यायालय आहे, त्याखालोखाल उच्च न्यायालय, जिल्हा आणि तालुका न्यायालय अशी रचना आढळते. अशा प्रकारे सर्वोच्च न्यायालयापासून ते तालुका न्यायालयापर्यंत संपूर्ण न्यायालयीन व्यवस्था एकात्मतेच्या तत्त्वावर आधारित आहे. भारतामध्ये संविधान सर्वोच्च आहे. राज्यघटनेमध्ये कालानुरूप बदल होत असतात. त्यामुळे राज्यघटनेच्या तत्त्वाचा अर्थ लावून राज्यघटनेचे संरक्षण करण्याचे कार्य न्यायालय करत असते. सर्वप्रथम आपण सर्वोच्च न्यायालयाविषयी जाणून घेऊ या. सर्वोच्च न्यायालयाची स्थापना २८ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटनेतील कलम १२४ ते कलम १४७ मध्ये न्यायालयाचे संघटन, स्वातंत्र्य, अधिकारक्षेत्र आणि कामकाज इत्यादींशी संबंधित तरतुदी आढळतात. यामध्ये बदल करण्याचे अधिकार भारतीय संसदेला देण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालय अभ्यासताना सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयाची रचना, न्यायाधीशांची संख्या, न्यायाधीशांची नियुक्ती प्रक्रिया, न्यायाधीश पदाविषयीच्या अटी इत्यादी बाबी माहीत करून घ्या. २०१७मध्ये राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग अधिनियम, २०१४ च्या या न्यायाधीशांच्या नियुक्तीविषयीच्या कायद्यावर आधारित सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यावर प्रश्न विचारला गेला.

Q. Critically examine the supreme courtls judgment on national judicial appointments commission act 2014 with reference to appointment of judges of higher judiciary in India.

यासोबतच सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार, कार्य, भूमिका यासंबंधी संविधानामध्ये विस्तृत प्रकारच्या तरतुदी केलेल्या आहेत. त्या माहीत असणे आवश्यक आहे. यामध्ये प्रारंभिक अधिकार क्षेत्र, अपिलाचे अधिकारक्षेत्र, सल्लाविषयक अधिकारक्षेत्र, घटनात्मक उपाययोजना संबंधितचे अधिकार क्षेत्र, अभिलेख न्यायालय, न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार इत्यादी माहीत असणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश इतर न्यायालयांना बंधनकारक असतात. इतर देशांच्या न्यायालयांपेक्षा भारतातील सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि कार्याचे स्वरूप व्यापक आहे. भारतामध्ये दुहेरी न्यायव्यवस्था असल्याने केंद्र व राज्य, राज्य व राज्य यांच्यातील वादांचे निराकरण करण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करत असते. सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेवर आधारित दिल्ली सरकार व नायब राज्यपाल यांच्यातील विवादासंबंधित २०१८मध्ये प्रश्न विचारला गेला.



Whether the supreme court judgment (July 2018) can settle the political tussle between the Lt. Governor and elected government of Delhi? Examine

या अधिकारामुळे सर्वोच्च न्यायालय भारतात संघीय न्यायालयाची भूमिका पार पाडते. याबरोबरच संविधानाचे संरक्षण व सर्वोच्चता ही जबाबदारीसुद्धा न्यायालय पार पाडत असते. त्यासाठीच न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला बहाल करण्यात आला आहे. परिणामी, राज्यघटनेच्या चौकटीतच संसदेने आपले कार्य करणे अपेक्षित आहे. संसदेने राज्यघटनेच्या मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न केला आहे तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराद्वारे संसदेचे कायदे रद्दबातल केले आहेत. पुनर्विलोकनाबरोबरच न्यायालयाशी संबंधित दुसरी संकल्पना म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय. या संकल्पनेचा विकास १९८० नंतर झालेला दिसतो. १९८० नंतर भारतीय राजकारणामध्ये काँग्रेस पक्षाचे प्राबल्य कमी झाले, प्रादेशिक पक्षांचा विकास, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, संसदीय सत्तेचे पतन इत्यादीमुळे सार्वजनिक धोरणांची अंमलबजावणी करण्यात शासन कार्यक्षम नाही असे आढळून आले. या वेळेस जनतेच्या हिताकरिता अनेकदा सर्वोच्च न्यायालय सक्रिय झाले. यामध्ये दारिद्र्य, भ्रष्टाचार, सार्वजनिक सेवा, दलितांचे हक्क, कामगारांचे प्रश्न, पर्यावरण आणि भ्रष्टाचार इत्यादी विषयांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने लक्ष घातले. न्यायालयीन सक्रियतेमध्ये १९८२ नंतर एक नवीन उपक्रम सुरू केला गेला तो 'जनहित याचिका'

म्हणून ओळखला जातो. या उपक्रमाचा उद्देश जनतेला कमी वेळात आणि कमी खर्चात न्याय मिळवून देणे हा होता. या पार्श्वभूमीवर २०२०च्या मुख्य परीक्षेमध्ये न्यायालयीन विधियन (Judicial legislation) आणि सार्वजनिक हित याचिका (PIL) या बाबींच्या पार्श्वभूमीवर प्रश्न विचारला गेला होता.

भारतामध्ये राज्यांकरिता उच्च न्यायालयाची तरतूद आहे. प्रत्येक उच्च न्यायालयामध्ये एक मुख्य न्यायाधीश व राष्ट्रपती निवडतील तितके न्यायाधीश असू शकतात. या न्यायाधीशांची संख्या निश्चित करण्यात आलेली नाही. या सर्व न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती करतात. सध्या देशामध्ये २४ उच्च न्यायालय आहेत. सर्वोच्च न्यायालयाप्रमाणेच उच्च न्यायालयाचा अभ्यास करताना उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र, न्यायाधीशांची नियुक्ती, अधिकार इत्यादी बाबी माहीत असणे आवश्यक ठरते.

राज्यघटना, मूलभूत अधिकार, लोकशाही इत्यादींचे रक्षण करण्यासाठी स्वतंत्र व मुक्त न्याय व्यवस्था असणे अपरिहार्य आहे. याकरिता भारतीय संविधानाने न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य सुनिश्चित केले आहे. यामध्ये न्यायव्यवस्थेला कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि शासनाच्या इतर घटकांचा हस्तक्षेप व प्रभाव यापासून मुक्त ठेवण्यासाठी संविधानामध्ये काही तरतुदी आढळतात.

१) न्यायाधीशांची पात्रता व नेमणूक
२) न्यायाधीशांना कार्यकाळाची सुरक्षा
३) न्यायाधीशांना मिळणारे वेतन व भत्ते तसेच
४) निवृत्तीनंतर वकिली करण्यास प्रतिबंध करणे
५) टीकेपासून मुक्तता
६) न्यायालयीन कर्मचारी वर्गाची नियुक्ती तसेच त्यांच्या सेवाशर्ती ठरविण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार इत्यादी.

न्यायव्यवस्थेचे अध्ययन करण्यासाठी 'भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया (खंड १) (तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर) तसेच इंडियन पॉलिटी (एम-लक्ष्मीकांत) आणि न्यायालयविषयक समकालीन घडामोडी जसे न्यायालयाचे निवाडे, संसदेने केलेले विविध कायदे, जनहित याचिका या समकालीन बाबींकरिता 'द हिंदू' किंवा 'इंडियन एक्स्प्रेस' यापैकी एक वृत्तपत्र वापरता येईल.

यूपीएससीची तयारी

घटकराज्यांचे शासन

प्रवीण चौगले

प्रस्तुत लेखामध्ये युपीएससी मुख्य परीक्षेतील सामान्य अध्ययन पेपर २ मधील राजकीय व्यवस्था व राजकीय प्रक्रिया या घटकाअंतर्गत घटकराज्यांमधील शासन व्यवस्थेविषयी जाणून घेणार आहोत. केंद्र शासनाप्रमाणेच घटक राज्यांमधील शासनप्रणालीदेखील संसदीय पद्धतीची आहे. मात्र, केंद्रीय शासन पद्धतीपेक्षा घटकराज्याचे शासन काही अंशी वेगळे ठरते. पहिली बाब म्हणजे केंद्रीय संसदेच्या तुलनेत राज्य विधिमंडळाची शक्ती व भूमिका अत्यंत मर्यादित आहे. दुसरी बाब अशी की, राज्यांमधील विधिमंडळाची रचना देशात सर्वत्र सारखी नाही. भारतीय संघराज्य विशेषत्वाने एकात्म स्वरूपाचे असल्यामुळे घटक राज्यांच्या कायमस्वरूपी अस्तित्वाची हमी राज्यघटनेने दिलेली नाही. तसेच घटक राज्यांमध्ये संसदेप्रमाणेच कायदेमंडळाची दोन सभागृहे असतील अशी तरतूद नाही. त्यामुळे बहुतांश राज्यातील राज्यकारभार केवळ एकाच सभागृहाद्वारे नियंत्रित केला जातो.

सर्वप्रथम आपण घटक राज्यातील कार्यकारी मंडळाचा आढावा घेऊ. यामध्ये राज्यपाल, मुख्यमंत्री आणि त्यांच्या मंत्रिमंडळाचा समावेश होतो. तथापि, सदर लेखामध्ये आपण फक्त राज्यपाल पदाविषयी चर्चा करणार आहोत. भारतातील घटकराज्यांचा घटनात्मक प्रमुख राज्यपाल असतो. संविधानातील कलम १५३ ते १६७ यामध्ये राज्यपालांच्या संबंधीच्या तरतुदींचा समावेश आहे. यापैकी कलम १५५ नुसार केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शिफारशीवरून राष्ट्रपती घटकराज्यासाठी राज्यपालांची नियुक्ती करतात व कलम १५६ नुसार राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत राज्यपाल पदावर राहू शकतात. राज्यपाल हा केंद्र शासन व घटक राज्य यांना जोडणारा दुवा असून ज्याद्वारे भारतीय संघराज्यामधील राजकीय एकात्मीकरण साधण्यात येते. संविधानामध्ये प्रत्येक राज्यासाठी एक किंवा दोन वा अधिक राज्यांसाठी एक राज्यपाल नियुक्त करण्याची तरतूद केली आहे. राज्याचा घटनात्मक प्रमुख म्हणून मुख्यमंत्री, इतर मंत्री, लोकसेवा आयोगाचे सदस्य इत्यादींची नियुक्ती करण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. केंद्र शासनाच्या इच्छेनुसार राज्यपालांच्या नेमणुका होत असल्यामुळे राज्यपाल पद हे सुरुवातीपासूनच वादग्रस्त ठरले आहे. विशेषतः कलम ३५६ च्या तरतुदीमुळे राज्यपाल पद नेहमीच वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या कलमासंबंधी राज्यपालांच्या पक्षपाती भूमिकेमुळे कित्येकदा वाद निर्माण झाले आहेत. तसेच कलम २०० नुसार राज्य विधिमंडळाचे एखादे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखीव ठेवण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. असे विधेयक राज्यपालांनी राखीव ठेवल्यास राष्ट्रपतींच्या संमती खेरीज त्याचे कायद्यात रूपांतर होत नाही. परिणामी, राज्यपाल पद केंद्राचे हस्तक आहे अशी टीका करण्यात येते. राज्यपाल पदाचे अध्ययन करताना राज्यपालांचे स्व-विवेकाधीन अधिकार, कार्यकारी अधिकार, विधिविषयक अधिकार, न्यायिक अधिकार, आणीबाणी विषयक अधिकार यांची माहिती घ्यावी. तसेच, राज्यपालांना काही राज्यांमधील प्रदेशांबाबत विशेष जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत त्याविषयी जाणून घ्या. उदा. महाराष्ट्राच्या राज्यपालास विदर्भ आणि मराठवाड्यासाठी स्वतंत्र विकास मंडळाची स्थापना करण्याचा अधिकार. राज्यपालपदाची तयारी समकालीन घडामोडींच्या पार्श्वभूमीवर करणे आवश्यक ठरते या पार्श्वभूमीवर दिल्लीतील नायब राज्यपाल पदासंबंधी मुख्य परीक्षेत प्रश्न विचारण्यात आलेला आहे.

विधानसभा

विधानसभा हे कनिष्ठ सभागृह आहे. विधानसभेत राज्याच्या लोकसंख्येनुसार कमीत कमी साठ ते जास्तीत जास्त पाचशे सभासद असतात. या सभागृहाचे सदस्य प्रादेशिक मतदारसंघांमधून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे प्रौढ मताधिकाराच्या तत्वांवर निवडले जातात. प्रत्येक मतदारसंघाची लोकसंख्या व प्रतिनिधींची संख्या यांच्यातील गुणोत्तर संपूर्ण राज्यभर शक्यतो सारखेच रहावे अशी दक्षता घेतली जाते. सभेची रचना अधिकार लोकसभेचेप्रमाणेच आहे. परीक्षेच्या दृष्टीने विधानसभेची तयारी करताना विधानसभेच्या अधिकारांवर असणाऱ्या मर्यादा जाणून घेणे आवश्यक ठरते. उदा. काही विधेयके विधिमंडळात मांडण्यापूर्वी त्यांना राष्ट्रपतींची पूर्वपरवानगी लागते किंवा घटनात्मक आणीबाणी, राज्यपालांचा स्वाविवेकाधिन अधिकार तसेच समवर्ती सूचीबाबत केंद्रीय कायद्यांचे श्रेष्ठत्व.

विधानपरिषद

विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह आहे. एखाद्या राज्यात विधानपरिषदेची निर्मिती करता येते अथवा अस्तित्वात असलेली विधानपरिषद बरखास्त करता येते. त्यासाठी पुढील बाबींची पूर्तता आवश्यक ठरते. १)संबंधित राज्याच्या विधानसभेने विशेष बहुमताने असा ठराव पारित करावा लागतो आणि २) हा ठराव संसदेने साध्या बहुमताने मंजूर करावा लागतो. सध्या भारतामध्ये सात राज्यांमध्ये विधानपरिषद अस्तित्वात आहे तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये विधिमंडळ एकगृही आहे. विधानपरिषदेची राज्यसभेशी तुलना केल्यास विधान परिषदेला राज्यसभेपेक्षाही दुय्यम स्वरूपाचे अधिकार आहेत असे आढळून येते. परिणामी, ज्या राज्यांमध्ये द्विगृही विधिमंडळ आहे तिथे विधानसभेचे वर्चस्व असल्याचे पहावयास मिळते. विधानपरिषदेत कमीत कमी ४० आणि जास्तीत जास्त त्या राज्याच्या विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या एक तृतीयांश इतके सदस्य असतात. विधानपरिषद या घटकाची तयारी करताना विधानपरिषद व विधानसभा यांचा तुलनात्मक अभ्यास करणे परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. २०२१ च्या मुख्य परीक्षेमध्ये विधान परिषदेवर प्रश्न विचारण्यात आला.

Q. Explain the constitutional provisions under which legislative councils are established. Review the working and current status of legislative councils with suitable institutions. 250 words

घटकराज्यांचे शासन या अभ्यासघटकाची तयारी 'भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया (खंड १)' (तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर), इंडियन पोलिटी (एम. लक्ष्मीकांत) तसेच समकालीन घडामोडींकरीता 'लोकसत्ता', 'इंडियन एक्स्प्रेस' सारखी वृत्तपत्रे आणि योजना, EPW यासारखी मासिके अभ्यासावीत.



एमपीएससी मंत्र

रोहिणी शहा

दुय्यम सेवा मुख्य परीक्षा

पदनिहाय पेपर विश्लेषण

दुय्यम सेवा मुख्य परीक्षा संयुक्त पेपर १च्या तयारीबाबत मागील लेखामध्ये चर्चा करण्यात आली. पेपर दोन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र असला तरी त्यामध्ये सामान्य क्षमता चाचणी हा घटक समान आहे. सामान्य क्षमता चाचणी या घटकाचा आयोगाने विहित केलेला अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे...

बुद्धिमत्ता चाचणी

महाराष्ट्राचा इतिहास सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्त्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी, महाराष्ट्राचा भूगोल, महाराष्ट्राचा रचनात्मक भूगोल, मुख्य रचनात्मक विभाग, हवामान, पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल - लोकसंख्या, Migration of Population व त्याचे Source आणि destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्ट्या व त्यांचे पुनर्वसन.

भारतीय राज्यघटना घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्त्वे, घटनेची महत्त्वाची कलमे/ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे - शिक्षण, युनिफॉर्म सिव्हिल कोड, स्वतंत्र न्यायपालिका (तिन्ही पदांसाठी) राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाची भूमिका, अधिकार व कार्य, राज्य विधि मंडळ - विधानसभा, विधान परिषद आणि त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व भूमिका, विधि समित्या. (केवळ ASO व STI साठी) पेपर दोनमधील या पदांच्या कर्तव्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानावर आधारित प्रत्येक पदासाठी वेगळ्याने विहित केलेला अभ्यासक्रम पुढीलप्रमाणेः

सहायक कक्ष अधिकारी

राजकीय यंत्रणा (शासनाची रचना, अधिकार व कार्ये), केंद्र सरकार, केंद्र विधिमंडळ आणि राज्य सरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ).

जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन न्यायमंडळ - न्यायमंडळाची रचना, एकात्मिक न्याय मंडळ - कार्ये, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भूमिका व अधिकार, दुय्यम न्यायालये - लोकपाल, लोकायुक्त आणि लोकन्यायालय, सांविधानिक आदेशाचे रक्षण करणारे न्यायमंडळ, न्यायालयीन सक्रियता, जनहित याचिका, नियोजन प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मूल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देश फलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती, भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रूपरेखा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने, गरिबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल.

राज्य कर निरीक्षक:

नियोजन - प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मूल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देश फलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, ७३वी व ७४वी घटनादुरुस्ती, भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय

विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रूपरेखा, भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने, गरिबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल.

शहरी व ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास - पायाभूत सुविधांचे महत्त्व आणि गरज, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचा विकास आणि वाढ जसे ऊर्जा, पाणीपुरवठा, मलनिःसारण, गृह, परिवहन (रस्ते, बंदर इत्यादी), दळणवळण (पोस्ट, तार व दूरसंचार), रेडिओ, टीव्ही, इंटरनेट क्रायसिस, भारतातील इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रश्न आणि यासंबंधीचे धोरण व त्यावरील पर्याय; खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारी, एफडीआय आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे खासगीकरण, राज्य व केंद्र सरकारचे इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे धोरण, ग्रामीण व शहरी भागातील परिवहन व गृह याविषयीचे प्रश्न व त्यावरील केंद्र व राज्य सरकारचे कार्यक्रम आणि उपक्रमशीलता.

आर्थिक सुधारणा व कायदे पार्श्वभूमी, उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरण संकल्पना व त्याचा अर्थ आणि व्याप्ती, मर्यादा, केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा, WTO तरतुदी आणि सुधारणा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित परिणाम, प्रश्न व समस्या, GST, विक्रीकर, VAT, WTO इत्यादीशी संबंधित कायदे आणि नियम

आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय भांडवल, चळवळ, जागतिकीकरणाच्या युगातील सूत्र व काल, वाढ, रचना आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा, भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण, निर्यातीतील वाढ, WTO आणि आंतरराष्ट्रीय व्यापार, विदेशी भांडवलाचा अंतःप्रवाह, रचना व वाढ, FDI व्यापार, बहुराष्ट्रीय भांडवल पुरविणाऱ्या संस्था, IMF जागतिक बँक, IDA इंटरनॅशनल क्रेडिट रेटिंग.

सार्वजनिक वित्त व्यवस्था महसुलाचे साधन, टॅक्स, नॉन-टॅक्स, भारतातील केंद्र व राज्यातील सार्वजनिक ऋण, केंद्र व राज्याची सार्वजनिक खर्च वाढ, सार्वजनिक खर्च सुधारणा, कामावर आधारित अर्थसंकल्प, शून्याधारित अर्थसंकल्प, भारतातील करसुधारणा आढावा, राज्य पातळीवरील करसुधारणा, VAT, सार्वजनिक ऋणवाढ, रचना आणि भार, राज्याची कर्जबाजारीपणाची केंद्राला समस्या, राजकोषीय तूट, संकल्पना, तुटीचे नियंत्रण, केंद्र, राज्य व रिझर्व्ह बँकेचे उपक्रम, भारतातील राजकोषीय सुधारणा, केंद्र व राज्यस्तरावरील आढावा.

पोलीस उपनिरीक्षक :

मानवी हक्क व जबाबदाऱ्या, संकल्पना, आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानके, त्या संदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदाऱ्या, यंत्रणेची अंमलबजावणी आणि संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरिबी, निरक्षरता, बेकारी, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक प्रथा यांसारख्या अडचणी. (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी), लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्त्व,

नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५; मानवी हक्क संरक्षण अधिनियम,१९९३; कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५; अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम, १९८९, हुंडाबंदी अधिनियम, १९६१; महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ भारतीय दंड संहिता, १८६०, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ भारतीय पुरावा अधिनियम, १८७२

दुय्यम सेवा मुख्य परीक्षा पदनिहाय पेपर

यूपीएससीची तयारी

रोहिणी शहा

इतिहास





दुय्यम सेवा संयुक्त पूर्वपरीक्षेचा निकाल तिन्ही पदांच्या उपलब्ध संख्येनुसार स्वतंत्रपणे जाहीर होतो व मुख्य परीक्षेतील पेपर एक या तिन्ही पदांसाठी संयुक्त असतो, तर पेपर दोन हा पदनिहाय स्वतंत्र. बहुतांश उमेदवारांनी तिन्ही पदांसाठी अर्ज केलेला असतोच आणि ते गृहीत धरूनच पदनिहाय पेपर हे थोड्या गॅपनंतर होतात.

पदनिहाय स्वतंत्र पेपरमध्येही जवळपास ३० टक्के अभ्यासक्रम हा सामायिक आहे. या सामायिक घटकांची तयारी एकत्रितपणे केल्यास स्वतंत्र अभ्यासक्रमांसाठी जास्त वेळ उपलब्ध होतो. या लेखामध्ये सामायिक अभ्यासक्रमाच्या इतिहास घटकाच्या तयारीबाबत चर्चा करण्यात येत आहे.

तिन्ही पदांसाठी पेपर दोनमध्ये विहित केलेला इतिहास घटकाचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्राचा इतिहास : सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५ - १९४७) महत्त्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी

विहित अभ्यासक्रमाचे बारकाईने विश्लेषण करून मगच अभ्यास सुरू करणे आवश्यक आहे. अन्यथा निरुपयोगी बाबी अभ्यासत बसून वेळ वाया जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सन १८८५ पासूनचा आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास ही या घटकाची आऊटलाइन आहे. या चौकटीमध्ये राहूनच या घटकाची तयारी करायला हवी. केवळ सामाजिक जागृती, राष्ट्रीय चळवळी हे मुद्दे पूर्णपणे राष्ट्रीय परिप्रेक्ष्यातून पाहावे आणि इतर मुद्द्यांची तयारी महाराष्ट्राच्या सीमेत राहून करावी हेच आयोगाला अपेक्षित आहे. हे लक्षात घेऊन इतिहासाचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल:

सामाजिक जागृतीमध्ये सामाजिक सुधारणा चळवळी, सुधारक, त्यांचे कार्य, मागण्या, विरोध, भूमिका, ब्रिटिशांचे सामाजिक सुधारणांचे प्रयत्न या बाबी समजून घ्याव्यात. यामध्ये ठळक राष्ट्रीय सुधारक, संस्था, ब्रिटिशांचे प्रयत्न या बाबींचा आढावा आवश्यक आहे.

आर्थिक जागृतीमध्ये शेतकरी, आदिवासी, कष्टकरी जनता, कामगार यांच्या संघटना, उठाव, त्याची कारणे व परिणाम यांचा आढावा घ्यावा. त्याचबरोबर ब्रिटिशांच्या आर्थिक पिळवणुकीबाबतचे सिद्धांत, ते मांडणारे भारतातील सर्व अभ्यासक यांचाही अभ्यास आवश्यक आहे.

वर्तमानपत्रे, त्यांचे संस्थापक, संपादक, ब्रीदवाक्य, भाषा, प्रकाशनाचा काळ, ठिकाण, प्रसिद्ध लेख, लेखक, सामायिक व राजकीय भूमिका, समकालीन ब्रिटिश राज्यकर्ते, झाली असल्यास कार्यवाहीचे स्वरूप, इतर आनुषंगिक माहिती या मुद्द्यांच्या अनुषंगाने अभ्यासावीत.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणाच्या प्रसाराचे प्रयत्न, महिला व मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठीचे प्रयत्न, माध्यम व शिक्षणाच्या स्वरूपाविषयी समाजसुधारकांचे विचार, ब्रिटिशांनी स्थापन केलेले आयोग व त्यांच्या शिफारशी, ब्रिटिशांची भूमिका, स्वदेशी शैक्षणिक संस्था, विद्यापीठे व त्यांचे योगदान, संस्थापक, त्यांची कार्ये हे मुद्दे अभ्यासावेत.

महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये राजकीय व सामाजिकच नाही तर सांस्कृतिक योगदान देणाऱ्या व्यक्तींचा समावेश आहे. या व्यक्तींचा अभ्यास, त्यांचे कार्यक्षेत्र, कालावधी, महत्त्वाची उद्धरणे, स्थापन संस्था, कार्य, पुस्तके, असल्यास नियतकालिके, महत्त्वाच्या घटना, महत्त्वाची वैयक्तिक माहिती, असल्यास ब्रिटिशांशी संघर्षाचे स्वरूप, परिणाम यांचा आढावा घ्यावा.

राष्ट्रीय चळवळी अभ्यासताना महाराष्ट्राचा राजकीय इतिहास भारताच्याच इतिहासाचा भाग म्हणून अभ्यासणे आवश्यक आहे. सन १८८५ मधील काँग्रेसच्या स्थापनेपासून स्वातंत्र्यापर्यंत मुख्य प्रवाहातील संघर्षाचा अभ्यास आवश्यक आहे. मवाळ, जहाल कालखंड, गांधीयुगातील तीन महत्त्वाची आंदोलने, इतर महत्त्वाचे राजकीय पक्ष व त्यांची भूमिका आणि वाटचाल हा अभ्यासाचा गाभा ठेवायला हवा. याच वेळी महाराष्ट्रातील आणि इतर ठिकाणच्या महत्त्वाच्या राजकीय घडामोडी व त्यामध्ये सहभागी नेते, संघटना यांचे योगदान, त्याचा मुख्य प्रवाहातील संघर्षावर परिणाम यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

समकालीन चळवळींमध्ये जहाल कालखंडाशी समांतर क्रांतिकारी चळवळींचा थोडक्यात आढावा घ्यावा. दुसऱ्या कालखंडामध्ये महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळ जास्त विस्तृत असल्याने तिचा बारकाईने आढावा घ्यावा. महाराष्ट्रातील क्रांतिकारी संघटना, त्यांचे कार्य, नेते, संघर्षाचे स्वरूप, नेत्यांचे लेखन, प्रसिद्ध उद्धरणे, महत्त्वाच्या घटना यांचा बारकाईने आढावा घ्यावा. त्याचबरोबर आर्थिक जागृतीच्या अनुषंगाने अभ्यासलेल्या समांतर चळवळीतील ब्रिटिशविरोधी भूमिकाही समजून घ्यावी.

अभ्यासक्रमामध्ये स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्राचा इतिहास असा स्पष्ट उल्लेख असल्याने आधुनिक भारताच्या इतिहासातील महाराष्ट्राशी आणि महाराष्ट्रातील व्यक्ती, घटना आणि संस्था/संघटनांशी संबंधित बाबींवर जास्त प्रश्न विचारले जाणे गृहीत धरायला हवे. उदाहरणार्थ समकालीन चळवळींचा अभ्यास करताना बंगालमधील तिभागा आंदोलनापेक्षा महाराष्ट्रातील शेतकरी/ आदिवासींचे उठाव या मुद्द्यांवर भर असणे आवश्यक आहे.

यूपीएससीची तयारी

भारतातील निवडणूक प्रक्रिया

प्रवीण चौगले

प्रस्तुत लेखामध्ये आपण भारतातील निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेणार आहोत. प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये निवडणुका हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. भारतामध्येही संसदीय लोकशाहीच्या विकासामध्ये निवडणुकांचा महत्त्वाचा वाटा आहे. लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम असते हे निवडणुकीच्या माध्यमातून सिद्ध होते. भारतीय संविधानामध्ये जनतेचे सार्वभौमत्व स्वीकारण्यात आल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते राष्ट्रपती पदापर्यंतची निवडणूक ही लोकांकडूनच होत असते.

यूपीएससी मुख्य परीक्षेच्या अध्ययन पेपर २ करिता महत्त्वपूर्ण बाबी म्हणजे निवडणूक आयोग, भारतातील निवडणुकीची प्रक्रिया, लोकप्रतिनिधी कायदा, भारतातील निवडणूक सुधारणा, निवडणूक सुधारणासंबंधित वेळोवेळी नेमण्यात आलेले आयोग, महत्त्वाची पदे जसे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती इत्यादींची निवडणूक प्रक्रिया या बाबी जाणून घ्याव्यात.

सर्वप्रथम आपण निवडणूक आयोगाविषयी जाणून घेऊ. घटनाकारांनी निवडणूक यंत्रणेचे लोकशाहीतील मध्यवर्ती स्थान ओळखून भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ मध्ये स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद केली. यानुसार २५ जानेवारी १९५० रोजी भारतातील निवडणुकांचे नियोजन, संचलन आणि नियंत्रण करण्यासाठी निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. संसदेच्या तसेच राज्य विधिमंडळाच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे, तसेच राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या पदांच्या निवडणुकांचे संचालन करणे, राजकीय पक्षांना मान्यता आणि मतदान चिन्ह देणे, निवडणूक खर्चावर निगराणी ठेवणे इत्यादी कार्ये निवडणूक आयोगातर्फे पार पाडली जातात. भारतामध्ये संपूर्ण निवडणूक प्रक्रिया एकात्म स्वरूपाची असून ती एकाच मध्यवर्ती निवडणूक यंत्रणेच्या हाती सोपविली आहे व तिच्या मदतीकरिता प्रादेशिक आयुक्तांची तरतूद केली आहे. निवडणूक आयोगामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त आणि त्याखेरीज जेव्हा राष्ट्रपतींना वाटेल तेव्हा आणखी आयुक्त असतात. आयुक्तांच्या नेमणुकीसाठी संसदेने केलेल्या कायद्याच्या अधीन राहून राष्ट्रपती त्यांची नेमणूक करतात. यामध्ये निवडणूक आयुक्तांच्या निवडीबरोबरच त्यांचा कालावधी, त्यांचे अधिकार, कार्ये, बडतर्फी, पदाच्या सेवाशर्ती इत्यादी बाबी अभ्यासाव्यात. जसजसे भारतीय राजकारणातील गुंतागुंत, राजकीय पक्षांमधील स्पर्धा व निवडणुकीतील यशासाठी अयोग्य मार्गांचा वापर केला जाऊ लागला तसतसे निवडणूक आयोगाचे काम आव्हानात्मक बनले. परिणामी, आयोगाने या परिस्थितीत कठोर व सकारात्मक पावले उचलून आपले महत्त्व प्रस्थापित केले. निवडणूक आयोगाने भारतीय परिस्थितीतील खडतर आव्हाने पेलून प्रातिनिधिक लोकशाहीच्या चौकटीला बळकटी दिली. जनसामान्यांना निर्भय वातावरणात मतदान करता यावे यासाठी निवडणूक आयोगाने १९९६ पासून देशातील राजकीय पक्षांना आचारसंहिसहिता लागू केली. १९५१च्या पहिल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीपासून ते आजवर भारतातील लोकसभेच्या निवडणुका भयमुक्त, निःपक्षपाती व न्याय्य वातावरणात पार पाडल्या गेल्या याचे सर्व श्रेय निवडणूक आयोगाकडे जाते.

Q. In the light of recent controversy regarding the use of Electronic Voting Machines (EVM), what are the challenges before the Election Commission of India to ensure the trustworthiness of elections in India.

निवडणूक आयोगाचे अध्ययन करताना आयोगापुढे असणारी आव्हाने जाणून घ्यावीत. याकरिता समकालीन घडामोडींचे सखोल ज्ञान असणे आवश्यक ठरते. उपरोक्त प्रश्न भारतामध्ये गेल्या काही वर्षांपासून ईव्हीएम वापरासंबंधी असणाऱ्या वादाच्या पार्श्वभूमीवर विचारण्यात आला होता.

■ लोकप्रतिनिधी कायदा, १९५१

१२ मे १९५० रोजी निवडणूक प्रक्रियेचा कायदेशीर आकृतिबंध तयार करण्यासाठी संसदेने लोकप्रतिनिधित्व कायदा मंजूर केला. त्यामध्ये काही दुरुस्त्या करून १७ जुलै १९५१ रोजी लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ मंजूर करण्यात आला. यामध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहांत आणि सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकीची प्रक्रिया निश्चित केली गेली. लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ मध्ये वेळोवेळी दुरुस्त्या करण्यात आल्या. परीक्षेच्या दृष्टीने या कायद्यातील दुरुस्त्या, त्यामध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या तरतुदी यांची माहिती घ्यावी. हा कायदा परीक्षेकरिता महत्त्वाचा आहे. कारण यावर आजपर्यंत कित्येक वेळेला प्रश्न विचारले गेले आहेत. २०१९ व २०२० च्या परीक्षेमध्ये या कायद्यावर प्रश्न विचारले गेले, यातून या कायद्याचे महत्त्व अधोरेखित होते.

Q. "There is a need for simplification of procedure for disqualification of persons found guilty of corrupt practices under the Representation of people's Act." Comment. (150 Words) (2020)

Q. On what grounds a peoplel srepresentativecan be disqualified under the Representation of people. (2019)

Act,1951? Also mention the remedies available to such person against his disqualification. (15 Marks)

निवडणूक प्रक्रियेच्या अध्ययनासोबतच आजवर करण्यात आलेल्या निवडणूक प्रक्रियेतील सुधारणा तसेच अद्याप प्रलंबित असणाऱ्या निवडणूक सुधारणा यांची माहिती घेणे आवश्यक ठरते. उदा. सध्या प्रचलित असणाऱ्या बहुमताच्या पद्धतीऐवजी प्रत्येक समाजघटकाला उचित महत्त्व देणारी व विशेष बहुमताची प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धत स्वीकारली जावी, तसेच संसद आणि राज्यांच्या विधिमंडळात स्त्रियांना एकतृतीयांश जागा राखीव ठेवाव्यात, निवडणूक प्रक्रियेतील पैशाचे महत्त्व कमी व्हावे, जातीय व धार्मिक आवाहनांना पूर्णपणे प्रतिबंध घालणे इ. प्रलंबित सुधारणांविषयी जाणून घ्यावे.

या घटकाच्या अध्ययनासाठी 'भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया (खंड १) (तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर) हा संदर्भ ग्रंथ उपयुक्त ठरेल. या घटकावरील चालू घडामोडींकरिता 'द हिंदू' किंवा 'इंडियन एक्सप्रेस' आणि 'लोकसत्ता' यापैकी एक वृत्तपत्र वाचावे. तसेच योजना हे मासिक व पीआरएस लेजिस्लेटिव्ह हे संकेतस्थळ उपयुक्त ठरेल.

एमपीएससी मंत्र

फारुक नाईकवाडे

दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - भूगोल

दुय्यम सेवा संयुक्त पूर्वपरीक्षेच्या पदनिहाय स्वतंत्र पेपरमध्ये जवळपास ३० टक्के अभ्यासक्रम हा सामायिक आहे. या सामायिक घटकांची तयारी एकत्रितपणे केल्यास स्वतंत्र अभ्यासक्रमांसाठी जास्त वेळ उपलब्ध होतो. या लेखामध्ये सामायिक अभ्यासक्रमाच्या भूगोल घटकाच्या तयारीबाबत चर्चा करण्यात येत आहे. तिन्ही पदांसाठी पेपर दोनमध्ये विहित केलेला भूगोल घटकाचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्राचा भूगोल अभ्यासक्रम

महाराष्ट्राचा रचनात्मक भूगोल, मुख्य रचनात्मक विभाग, हवामान, पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल - लोकसंख्या, Migration of Population आणि त्याचे Source आणि destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या आणि तांडे, झोपडपट्या व त्यांचे पुनर्वसन.

या घटकाची तयारी पुढीलप्रमाणे करता येईल -

महाराष्ट्राचा प्राकृतिक भूगोल (रचनात्मक)

यामध्ये महाराष्ट्राच्या मुख्य हवामान विभागांचा नकाशाच्या आधारे अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागाची भौगोलिक वैशिष्ट्ये, हवामानाचे वैशिष्ट्यपूर्ण घटक, त्यामुळे होणारी मृदा, पिके, इतर आर्थिक उत्पादनांमध्ये या वैशिष्ट्याचे योगदान या बाबी समजून घ्याव्यात.

महाराष्ट्राचे हवामान विभाग हे दक्षिणोत्तर पसरले आहेत. त्यांचा पश्चिम ते पूर्व अशा क्रमाने अभ्यास केल्यास मान्सून, पर्जन्याचे वितरण, तापमानातील फरक यांचा तुलनात्मक अभ्यासही शक्य होईल.

राज्यातील नद्यांचा अभ्यास हा नदीखोऱ्यांचा/ प्रणालींचा घटक म्हणून करणे आवश्यक आहे. पर्वतप्रणालीचा नकाशावरील अभ्यास करतानाच त्यांचे आर्थिक महत्त्व, पर्जन्यनिर्मिती व हवामान इत्यादीमधील महत्त्व या बाबींचाही अभ्यास आवश्यक आहे. या प्रणालीची उत्तर ते दक्षिण क्रमाने सलगता समजून घ्यायला हवी. उदा. महाराष्ट्रात उत्तर ते दक्षिण पुढील क्रमाने प्रणाली आढळतात. सातपुडा पर्वत - तापी पूर्णा खोरे - अजिंठा डोंगररांगा - गोदावरी खोरे - हरिशचंद्र बालाघाट डोंगर - भीमा नदी खोरे - शंभू महादेव डोंगर - कृष्णा खोरे.

नैसर्गिक संपत्ती

महाराष्ट्रातील महत्त्वाची वने, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, जैवविविधता क्षेत्रे यांचा भौगोलिक व पर्यावरणीय वैशिष्ट्ये व महत्त्व या दृष्टीने अभ्यास करावा. वनांचे आर्थिक महत्त्व समजून घ्यावे.

महाराष्ट्रातील खनिजांचे उत्पादन होणारी क्षेत्रे, त्यांची भूशास्त्रीय रचना, उत्पादनाचे प्रमाण व गुणवत्ता, खाणींचे प्रकार या बाबी समजून घ्याव्यात.

भारतातील व महाराष्ट्रातील खडकांचे प्रकार पुढील मुद्द्यांच्या अनुषंगाने अभ्यासावेत. खडकांचा प्रकार, निर्मिती, कोठे आढळतो, भौगोलिक व वैज्ञानिक वैशिष्ट्ये, रचना, आर्थिक महत्त्व.

राजकीय

प्रशासकीय विभागातील जिल्हे, त्यांची मुख्यालये व त्यांची वैशिष्ट्ये, जिल्ह्यांची कालानुक्रमे निर्मिती, महत्त्वाची शहरे, आर्थिक व पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची ठिकाणे यांच्या टेबलमध्ये नोट्स काढाव्यात.

राज्यातील जिल्ह्यांच्या सीमा, इतर राज्यांच्या सीमेवरील जिल्हे, जिल्ह्यांच्या सीमा म्हणून उपयुक्त ठरणारी नदी/ डोंगर/ नैसर्गिक भूरूपे या बाबी अभ्यासक्रमामध्ये वेगळ्याने नमूद केलेल्या नसल्या तरी त्यांचा अभ्यास आवश्यक आहे. त्यामुळे राज्याचा राजकीय नकाशाही व्यवस्थित अभ्यासणे आवश्यक आहे.

लोकसंख्या भूगोल

भारताच्या आणि राज्याच्या लोकसंख्येचा साक्षरता, नागरीकरण, लिंग गुणोत्तर, रोजगार, लोकसंख्येची घनता या मुद्द्यांच्या आधारे आढावा घ्यावा. जन्मदर, मृत्युदर, बाल लिंग गुणोत्तर, माता मृत्युदर, अर्भक मृत्युदर, बाल मृत्युदर यांची माहिती असायला हवी.

वसाहतींचे प्रकार, आकार, स्वरूप, ठिकाण व आर्थिक महत्त्व पाहायला हवे. राज्यातील महत्त्वाच्या ठिकाणी कोणत्या प्रकारची वसाहत आहे हे समजून घेता आले तर उत्तम. पण माहिती नसल्यास वसाहतींचे प्रकार नीट अभ्यासले असतील तर एखाद्या प्रसिद्ध ठिकाणी वसाहत कोणत्या प्रकारे विकसित झालेली असू शकेल याचा अंदाज नक्की बांधता येऊ शकतो. असा अंदाज बांधण्याचा सराव तयारीच्या वेळी केल्यास एकूणच या घटकाची तयारी चांगली होईल.

स्थलांतराची कारणे, स्वरूप, समस्या, परिणाम व उपाय

या दृष्टीने अभ्यास आवश्यक आहे. या बाबतीत 'आकडेवारी' हा मुद्दा महत्त्वाचा आहे. विशेषतः महाराष्ट्राच्या संदर्भातील स्थलांतराची आकडेवारी (म्हणजे टक्केवारी) आर्थिक पाहणी अहवालामधून अद्ययावत करून घ्यायला हवी.

झोपडपट्टीची व्याख्या, तेथील परिस्थिती, त्यांच्या निर्मितीची कारणे यांचा आढावा घ्यायला हवा. झोपडपट्टी पुनर्वसन कायद्यातील ठळक बाबी माहीत असाव्यात तसेच त्या दृष्टीने अद्ययावत चालू घडामोडी माहीत असायला हव्यात.

चालू घडामोडींमध्ये खाणी, धरणे, महत्त्वाचे प्रकल्प यांबाबत नवे निर्णय, त्यांबाबत पर्यावरणीय मुद्दे, लोकांचा विरोध/ स्वीकार ही तथ्यात्मक माहिती करून घ्यावी. तसेच राज्यातील नैसर्गिक तसेच इतर गंभीर आपत्तींची अद्ययावत माहिती असायला हवी.

पंचायत राज व्यवस्था

यूपीएससीची तयारी

प्रवीण चौगले

प्रस्तुत लेखामध्ये यूपीएससी मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन पेपर दोनमधील पंचायत राज व्यवस्था या घटकाची परीक्षाभिमुख तयारी कशी करावी यावर चर्चा करणार आहोत. भारतात प्राचीन काळापासून ग्रामपंचायती ग्रामीण जीवनाचा एक भाग होत्या. भारतात वसाहतवादी राजवटीच्या काळात संसदीय शासन पद्धतीचा पाया घातला गेला. तथापि, संसदीय व्यवस्था केंद्रीकरणाकडे झुकलेली आहे हे स्वातंत्र्यलढ्यातील धुरीणांच्या लक्षात आले. यातूनच लोकशाही विकेंद्रीकरणाची चर्चा सुरू झाली. महात्मा गांधी यांनी विकेंद्रीकरणाचे प्रारूप म्हणून स्वावलंबी आणि स्वायत्त खेडे हाच केंद्रबिंदू मानला. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर अनेक समस्या होत्या त्यातून मार्ग काढण्यासाठी देशव्यापी विकास योजना आखण्यात आल्या. यामध्ये २ ऑक्टोबर १९५२ साली महात्मा गांधी जयंतीपासून समुदाय विकास कार्यक्रम लागू करण्यात आला. ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हा समुदाय विकास कार्यक्रमाचा उद्देश होता. समुदाय विकास कार्यक्रम व त्याला पूरक अशी राष्ट्रीय विस्तार सेवा यांचे मूल्यमापन करण्यासाठी बलवंतराय मेहता समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने सुचविलेल्या त्रिस्तरीय आराखड्यातून पंचायती राज व्यवस्था निर्माण झाली. २०१८ च्या मुख्य परीक्षामध्ये पंचायत राज व्यवस्थेच्या महत्त्वाविषयी प्रश्न विचारला गेला.

Q. Assess the importance of the panchayat system in India as a part of local government. Apart from government grants, what sources the Panchayat can look out for financing development projects? (2018).

पंचायत राज व्यवस्था या घटकावर बहुतांश प्रश्न समकालीन घडामोडींच्या पार्श्वभूमीवर विचारण्यात आले आहेत. या घटकाची तयारी करत असताना पंचायत राज व्यवस्थेच्या निर्मितीची पार्श्वभूमी, पंचायत राज व्यवस्थेशी संबंधित केंद्र सरकारकडून वेळोवेळी नेमण्यात आलेले आयोग, ७३वी आणि ७४वी घटनादुरुस्ती व गेल्या सुमारे ६० वर्षांतील पंचायत राज व्यवस्थेची जडणघडण, आव्हाने, समस्या इत्यादी बाबी जाणून घ्याव्यात. मुख्य परीक्षांमध्ये विचारलेले प्रश्न मुख्यत्वे करून चालू घडामोडींशी संबंधित असले तरी आपल्याला उपरोक्त बाबी माहीत असणे आवश्यक ठरते. सर्वप्रथम ७३ व ७४व्या घटना दुरुस्तीबाबत जाणून घेऊ. जून १९८६ मध्ये एल.एम.सिंघवी यांच्या अध्यक्षतेखालील 'लोकशाही आणि विकास कामासाठी पंचायतींचे पुनर्जीवन करण्यासाठी समिती'ची नियुक्ती केली गेली.

समितीने अनेक शिफारशी केल्या त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाची शिफारस म्हणजे पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा देणे होय. यानुसार १९९२ साली ७३वी घटनादुरुस्ती कायदा १९९२आणि ७४वी घटनादुरुस्ती कायदा १९९२ हे संमत केले गेले. या कायद्यांची अंमलबजावणी १९९३ पासून करण्यात आली. हे दोन्ही कायदे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारे साधन ठरले. ७३व्या घटनादुरुस्तीद्वारे राज्यघटनेमध्ये नवव्या भागात कलम २४३ चा समावेश करण्यात आला. तसेच, पंचायत राज संस्थांकडे २९ बाबी हस्तांतरित करण्यात आल्या. या बाबींचा अंतर्भाव असलेले अकरावे परिशिष्ट संविधानात समाविष्ट करण्यात आले. तसेच ७४ व्या घटना दुरुस्तीमध्ये कलम २४३ (P) ते २४३ (Z) यांचा समावेश केला गेला व भारतीय राज्यघटनेमध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशीसंबंधित १८ विषयांचा समावेश असणारे बारावे परिशिष्ट जोडण्यात आले. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्त्या अमलात आल्यानंतर त्याचे काही सकारात्मक परिणाम दिसून आले. यामध्ये प्रामुख्याने पंचायत राज व्यवस्थेने स्थानिक पातळीवर स्वशासनाला हातभार लावला, ग्रामीण जनतेला मूलभूत क्षमतांची जाणीव करून दिली, पंचायत राज व्यवस्थेमुळे शासकीय धोरणात जबाबदारी आणि पारदर्शकता वाढली, स्त्रियांच्या राजकीय व्यवस्थेतील सहभागामध्ये लक्षणीय वाढ झाली. पंचायत राज व्यवस्थेमुळे निर्णय निर्धारण प्रक्रियेचे विकेंद्रीकरण होताना दिसत आहे. या व्यवस्थेमुळे भारतीय संघराज्य व्यवस्थेला अधिक अर्थपूर्ण बनविले आणि शासनामध्ये घटनात्मक तिसरी पातळी अस्तित्वात आली. २०१९ च्या मुख्य परीक्षेमध्ये स्त्रियांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर प्रश्न विचारण्यात आला.

Q. "The reservation of seats for women in the institutions of local self-government has had a limited impact on the patriarchal character of the Indian Political Process." Comment.

या व्यवस्थेच्या सकारात्मक बाबीबरोबरच काही मर्यादाही दिसून येतात. राज्य यंत्रणेकडून अनेक विकासकामांची जबाबदारी स्थानिक यंत्रणेकडे सोपविण्यात आली. मात्र त्यासाठी आवश्यक असणारी संसाधने राज्य यंत्रणेकडून उपलब्ध केली गेली नाहीत. या घटनादुरुस्तीमध्ये राज्य सरकारांना निर्णायक अधिकार असल्याने कोणतेही राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्थांकडे आपल्या अधिकारांचे व संसाधनांचे हस्तांतरण स्वेच्छेने करायला तयार नसल्याचे दिसते. पंचायत राज व्यवस्थेच्या वाटचालीमध्ये कार्य, यंत्रणा आणि निधीचा अभाव या समस्या पूर्वीप्रमाणेच राहिल्या. एकंदरीत पंचायत राज समिती व्यवस्थेच्या विकासामध्ये राजकारणी व प्रशासकांचा उदासीन दृष्टिकोन दिसून येतो. यासोबतच पंचायत राज व्यवस्थेसमोरील आव्हाने जसे, निवडणूक सुधारणा, जनतेचा अधिकाधिक सहभाग, वित्तीय विकेंद्रीकरण सामाजिक परिस्थितीतील बदल इत्यादींबाबत जाणून घ्यावे.

या घटकाच्या तयारीकरिता 'भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया' (खंड १) (तुकाराम जाधव आणि महेश शिरापूरकर) या संदर्भ ग्रंथाचा वापर करावा. याबरोबरच समकालीन घडामोडींकरिता 'योजना' आणि 'कुरुक्षेत्र' ही मासिके उपयोगी ठरतील. 'द हिंदू' किंवा 'इंडियन एक्सप्रेस' ह्या वृत्तपत्रांचे वाचन आवश्यक ठरते.

दुय्यम सेवा मुख्य परीक्षा - राज्यव्यवस्था

एमपीएससी मंत्र

रोहिणी शहा

दुय्यम सेवा मुख्य परीक्षेमध्ये पेपर एक हा तिन्ही पदांसाठी संयुक्त असतो, तर पेपर दोन त्या त्या पदानुसार वेगळ्या अभ्यासक्रमाचा पदनिहाय स्वतंत्र असतो. या स्वतंत्र पेपरमध्ये जवळपास ३० टक्के अभ्यासक्रम हा सामाईक आहे. या सामाईक घटकांची तयारी एकत्रितपणे केल्यास स्वतंत्र अभ्यासक्रमांसाठी जास्त वेळ उपलब्ध होतो. तिन्ही पेपरमध्ये राज्यव्यवस्था घटक हा सामाईक असला तरी त्यातील काही भाग तिन्ही पदांसाठी आहे, तर काही भाग केवळ सहायक कक्ष अधिकारी व वित्रीकर निरीक्षक या पदांसाठी आहे.

आयोगाने तिन्ही पदांसाठी पेपर दोनमध्ये विहित केलेला राज्यव्यवस्था घटकाचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहे-

■ **भारतीय राज्यघटना (तिन्ही पदांसाठी)**

घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्त्वे, घटनेची महत्त्वाची कलमे/ ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे - शिक्षण, युनिफॉर्म सिव्हिल कोड, स्वतंत्र न्यायपालिका (सहायक कक्ष अधिकारी व वित्रीकर निरीक्षक पदांसाठी अतिरिक्त मुद्दे)

राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ रोल, अधिकार व कार्य, राज्य विधिमंडळ - विधानसभा, विधान परिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व रोल, विधि समित्या.

या घटकाची तयारी पुढीलप्रमाणे करता येईल:

■ **भारताची राज्यघटना**

भारतासाठी स्वतंत्र राज्यघटना असावी याबाबत स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये वेळोवेळी

झालेल्या मागण्या, ठराव व त्याबाबतचा प्रयत्न व त्यामागील भूमिका या बाबी समजून घेणे आवश्यक आहे.

घटना कशी तयार झाली याबाबत तयारी करताना घटना समितीची रचना, समित्या व त्यांचे सदस्य/ अध्यक्ष, समितीमधील महाराष्ट्रातील सदस्य, समितीच्या बैठका व त्यातील प्रसिद्ध चर्चा, समितीचे कार्य याबाबत अभ्यास करणे आवश्यक आहे.

घटनेची प्रस्तावना, त्यामागील वेगवेगळ्या नेत्यांच्या भूमिका व प्रतिक्रिया, त्यामध्ये समाविष्ट तत्त्वे/ विचार आणि प्रस्तावनेची घटना समजून घेण्यासाठीचे महत्त्व हे मुद्देही व्यवस्थित समजून घ्यावेत.

मूलभूत हक्क व कर्तव्ये याबाबतची सर्व कलमे मुळातून समजून घेऊन त्यामध्ये समाविष्ट अपवादांसहित पाठच करायला हवीत. त्याबाबतच्या चालू घडामोडी व सर्वोच्च न्यायालयाचे अद्ययावत निकाल माहीत असणे आवश्यक आहे. या तरतुदींबाबत झालेल्या घटनादुरुस्त्या व महत्त्वाचे सर्वोच्च न्यायालयाचे निकाल यांचा आढावा घेणे गरजेचे आहे.

राज्याच्या धोरणाची सर्व नीतिनिर्देशक तत्त्वे समजून घेणे आवश्यकच आहे. मात्र शिक्षण, युनिफॉर्म सिव्हिल कोड, स्वतंत्र न्यायपालिका या मुद्द्यांचा अभ्यासक्रमामध्ये विशेष उल्लेख केलेला असल्याने त्याबाबतची कलमे, तरतुदी व त्यानुसार केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी घेतलेले महत्त्वाचे निर्णय व केलेले कायदे समजून घ्यावेत. उदा. शिक्षण हक्क कायदा, न्यायपालिकांमधील नेमणुकांची कोलेजियम पद्धत व त्याबाबत शासन व न्यायपालिकेमधील संघर्ष इ.

राज्यघटनेतील महत्त्वाची कलमे ही केंद्र व राज्य संबंध व घटनादुरुस्ती तसेच घटनात्मक पदे यांपुरती मर्यादित ठेवता येतील. मात्र चालू घडामोडींच्या अनुषंगाने त्या त्या कलमांना महत्त्व देऊन त्यांच्यावर अभ्यासामध्ये भर देणे आवश्यक आहे.

केंद्र व राज्य सरकारे यांच्यामध्ये प्रशासकीय, आर्थिक व कायदेशीर अधिकारांची विभागणी कशा प्रकारे झाली आहे याबाबतची कलमे समजून घ्यावीत व सातव्या परिशिष्टातील विषयांची विभागणी व्यवस्थित समजून घ्यायला हवी. शक्य असेल तर केंद्र, राज्य व समवर्ती सूचीतील विषय पाठच करावेत.

■ **राज्य शासन**

हा भाग पोलीस उपनिरीक्षक पदासाठीच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट नाही. फक्त सहायक कक्ष अधिकारी आणि वित्री कर निरीक्षक या पदांसाठीच्या अभ्यासक्रमामध्ये आहे.

विधानसभा व विधान परिषदेच्या सदस्यांच्या निवडणुका, स्वीकृत सदस्यांच्या नेमणुका, सर्व सदस्यांचा कार्यकाळ, त्यांना पदावरून हटविणे, राजीनामा, हक्क, कर्तव्ये, राज्यपाल व मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाची नेमणूक, या सर्व मुद्द्यांशी संबंधित राज्यघटनेतील तरतुदी बारकाईने अभ्यासणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालांना असलेले विशेषाधिकार समजून घ्यावेत. विधानमंडळातील विधि समित्यांचा अभ्यास, त्यांची रचना, कार्ये व अधिकार या मुद्द्यांच्या आधारे करावा.

विधानसभा आणि विधान परिषद यांच्या कामकाजाची माहिती असायला हवी. विधेयके, त्याचे प्रकार, त्याच्याशी संबंधित घटनेतील तरतुदी, कायदानिर्मिती प्रक्रिया तसेच विविध प्रश्न/ ठराव इत्यादी कामकाजाचे महत्त्वाचे नियम माहीत असायला हवेत.

दुय्यम सेवा मुख्य परीक्षेच्या पदनिहाय पेपरमधील सामाईक अभ्यासक्रमाच्या तयारीबाबत आतापर्यंत चर्चा करण्यात आली. पुढील लेखापासून प्रत्येक पदासाठी स्वतंत्र विहित केलेल्या अभ्यासक्रमाची तयारी कशा प्रकारे करावी याबाबत चर्चा करण्यात येईल.

यूपीएससीची तयारी

सामाजिक न्याय

प्रवीण चौगले

आजच्या लेखामध्ये आपण यूपीएससी मुख्य परीक्षेतील सामान्य अध्ययन पेपर दोनमधील सामाजिक न्याय या अभ्यास घटकाची तयारी कशी करावी, याची माहिती घेणार आहोत.

सद्य:स्थितीमध्ये कल्याणकारी राज्याचे मूलभूत उद्दिष्ट सामाजिक न्यायाची स्थापना करणे आहे. यामध्ये सामाजिक, आर्थिक विषमता कमी करणे, समाजाचा सर्वसमावेशी विकास करणे, दुर्बल घटकांना सुरक्षितता वाटेल असे वातावरण असणे, इ. बाबींचा समावेश होतो. भारत एक कल्याणकारी राज्य आहे आणि भारतामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी लैंगिक, जातीय, वंश आणि आर्थिक भेदभावाशिवाय सर्व नागरिकांना हक्क सुनिश्चित करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. भारतीय राज्य व्यवस्थेमध्ये उदारमतवाद, लोकशाहीबरोबरच समाजवादी तत्त्वांनाही स्वीकारले गेले आहे. या अनुषंगाने आपल्या संविधानाच्या प्रास्ताविकामध्ये सामाजिक आर्थिक व राजकीय न्यायाचा उल्लेख केला गेला आहे. भारतातील संविधान निर्मात्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय यामध्ये संतुलन स्थापित करण्यासाठी संविधानाच्या भाग ३मध्ये मूलभूत अधिकारांतर्गत व्यक्तिस्वातंत्र्य आणि भाग चारमध्ये मार्गदर्शक तत्त्वांच्या अंतर्गत सामाजिक न्याय सुनिश्चित करण्याचा दृष्टिकोन ठेवला आहे.

Q. "Besides being a moral imperative of Welfare state, primary health structure is a necessary precondition for sustainable development." (2021)

या अभ्यास घटकामध्ये राज्य व केंद्र शासन समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी राबवत असलेले विविध उपक्रम, या कार्यक्रमांची दुर्बल घटकांच्या सबलीकरणातील परिणामकारकता, भारत सरकारने दुर्बल घटकांच्या सबलीकरणाकरिता केलेल्या विविध संस्थात्मक, वैधानिक उपाययोजना, कायदे, आरोग्य, शिक्षण, मानव संसाधनाशी संबंधित सेवांचा विकास आणि व्यवस्थापनाशी संबंधित मुद्दे, गरिबी व भूक यासंबंधीचे मुद्दे यांचा समावेश होतो. या सर्व घटकांची गतवर्षीय प्रश्नपत्रिकांमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने चर्चा करणार आहोत. भारत सरकार तसेच घटकराज्ये समाजातील दुर्बल घटक जसे महिला, बालके, अनुसूचित जाती-जमाती, वृद्ध, असंघटित कामगार, दिव्यांग यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवत असते. उदाहरणार्थ, स्त्रियांसाठी जननी सुरक्षा कार्यक्रम, वृद्धांसाठी निवृत्तीवेतन, बालकांसाठी कळऊ सारखे कार्यक्रम तसेच राष्ट्रीय महिला आयोग, मागासवर्गीय आयोग, अनुसूचित जाती अनुसूचित जमाती आयोग, घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा, बाल हक्क संरक्षण कायदा आदी संस्थात्मक व वैधानिक उपायोजनाही केल्या जातात. या सर्व उपाययोजना त्यांची परिणामकारकता समकालीन मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर अभ्यासणे आवश्यक ठरते.



सामाजिक क्षेत्रावर शासनाकडून प्रचंड रक्कम खर्च केली जाते यामागची भूमिका विचारात घ्यावी. कारण मोठ्या प्रमाणावर कल्याणकारी योजना राबवूनही मानवी विकास निर्देशांकाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास असे आढळते की, आजही माता- बालमृत्यू दर, गरिबी, कुपोषण, सरासरी आयुर्मान, साक्षरता, शाळांमधील पटनोंदणी इत्यादी स्तरावर पीछेहाट दिसून येते. २०२१च्या मुख्य परीक्षेमध्ये स्वातंत्र्योत्तर भारतातील महिलांनी विविध क्षेत्रांमध्ये आपली छाप पाडलेली आहे. महिला आणि स्त्रीवादी चळवळी यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पुरुषसत्ताक आहे ही बाब बदलण्याकरिता महिला सबलीकरण योजना, महिलांचे शिक्षण याव्यतिरिक्त काय करता येईल असा प्रश्न विचारला गेला.

Q. "Though women in post independent India have excelled in various fields, the social attitude towards women and feminist movement has been patriarchal." Apart from women education and women empowerment schemes, what interventions can help change this milieu? (250 words).

या पद्धतीच्या प्रश्नांचे उत्तर लिहिताना आपल्याला महिलांविषयीचे कायदे, योजना किंवा इतर तरतुदीं चालू घडामोडीच्या पार्श्वभूमीवर ज्ञात असणे आवश्यक ठरते. याबाबतीत ग्रामीण भागात स्वयंसहायता गट करत असलेल्या कार्याचे उदाहरण देता येईल. या गटाशी संबंधित असणाऱ्या महिला लिंग विषमतेवर मात करून स्वावलंबी बनल्या आहेत. ग्रामीण भागातील महिलांचा हा नवीन सामाजिक व्यवस्थेच्या रूपातील उदय जुनाट पितृसत्ताक मानसिकतेला धक्का आहे. यामुळे बऱ्याचदा स्वयंसहाय्यता गटांना प्रोत्साहन मिळत नाही किंवा समाजावर होणाऱ्या त्यांच्या प्रभावाची सहसा दखल घेतली जात नाही. स्वयंसहायता गटांसारख्या उपक्रमांचे उदाहरण अथवा केस स्टडी यांचा आपल्याला उत्तरांमध्ये उल्लेख करता येईल. या अभ्यासक्रमातील गरीबी, भूक यामध्ये भारतातील कुपोषण, भूक, अन्नटंचाईच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजना, अन्नधान्य व्यवस्थापनातील सुधारणातसेच गरीबी निर्मूलनाचे उपाय इत्यादी बाबी जाणून घ्याव्यात.



या घटकावर विचारण्यात येणारे प्रश्न परस्पर व्यापी (Overlapping) स्वरूपाचे असतात म्हणून या घटकाची तयारी करण्यासाठी संदर्भ साहित्याची निवड काळजीपूर्वक करणे आवश्यक ठरते. या घटकाशी संबंधित तयारी कोणत्याही एका संदर्भ साहित्यामधून होत नाही, याकरिता द हिंदू, इंडियन एक्स्प्रेस यामध्ये येणाऱ्या सरकारी योजना, कार्यक्रम, कायदे संस्था, इ. बाबतचे त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनी लिहिलेले विशेष लेख नियमितपणे पहावेत. याबरोबर योजना, कुरुक्षेत्र ही नियतकालिके व इंडिया इअर बुकमधील निवडक प्रकरणांचे अध्ययन उपयुक्त ठरेल. सरकारी योजना व कार्यक्रमांच्या माहितीकरिता PIB आणि संबंधित मंत्रालयाची संकेतस्थळे नियमितपणे पाहावीत.

एमपीएससी मंत्र

सहायक कक्ष अधिकारी

पदनिहाय पेपरची तयारी

फारुक नाईकवाडे

दुय्यम सेवा मुख्य परीक्षेच्या पेपर दोनमधील तिन्ही पदांसाठी सामायिक असलेल्या अभ्यासक्रमाच्या तयारीबाबत मागील लेखांमध्ये चर्चा करण्यात आली. या लेखापासून पेपर दोनमधील या पदांच्या कर्तव्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानावर आधारित प्रत्येक पदासाठी वेगळ्याने विहित केलेल्या अभ्यासक्रमाच्या तयारीबाबत चर्चा करण्यात येत आहे.

सहायक कक्ष अधिकारी पदासाठीची तयारी पुढीलप्रमाणे करता येईल :

राजकीय यंत्रणा

यामध्ये प्रत्यक्ष प्रशासन व शासन धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा व त्यासंबंधी विविध घटकांचा समावेश होतो. महाराष्ट्र राज्याची निर्मिती आणि पुनर्रचनेचा भाग पेपर १ मधून अभ्यासावा. केंद्र व राज्य शासनाची निवड, रचना, कार्ये, अधिकार, कार्यपद्धती या बाबी तथ्यात्मक आणि संकल्पनात्मक आहेत. याबाबतच्या घटनेतील तरतुदी व्यवस्थित समजून घ्याव्यात.

लोकसभा/ राज्यसभा/ विधानसभा/ विधान परिषद यांची रचना, कार्यकाळ, पदाधिकारी, सदस्यसंख्या, निवडणूक, लोकप्रतिनिधित्व कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी या बाबी बारकाईने अभ्यासाव्यात.

लोकसभा/ राज्यसभा/ विधानसभा/ विधान परिषद यांचे कामकाज, त्यांच्या समित्या, रचना, कार्ये, अधिकार, कायदानिर्मिती प्रक्रिया, अर्थसंकल्पविषयक कामकाज यांच्याबाबत घटनेतील तरतुदी व्यवस्थित समजून घ्याव्यात. त्यासाठी त्यांची कामकाज नियमावली पाहणे आवश्यक आहे.

राज्यपालांचे अधिकार, कार्ये, नेमणूक याबाबतच्या तरतुदी समजून घ्याव्यात. महाराष्ट्राच्या राज्यपालांना असलेले विशेषाधिकार व्यवस्थित माहीत असायला हवेत.

राज्याची विविध संचालनालये तसेच प्रशिक्षण संस्थांची स्थापना, उद्देश, त्यांचे कार्य, रचना, बोधचिन्ह/ वाक्य माहीत असावे.

जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन

ग्रामीण प्रशासनामध्ये जिल्हा ते ग्रामपंचायत अशा उतरंडीचा टेबल फॉर्ममध्ये अभ्यास करता येईल. यामध्ये पुन्हा महसुली व विकासात्मक आणि पोलीस प्रशासन वेगवेगळे लक्षात घ्यायला हवे. अधिकाऱ्यांची उतरंड व त्यांचे अधिकार, कार्य, नेमणूक, राजीनामा, पदावरून काढून टाकणे या बाबी समजून घ्यायला हव्यात.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी याच प्रशासनाचा भाग आहेत. त्यांच्या निवडणुकांबाबतच्या तरतुदी, कार्यकाळ, विसर्जित करण्याचे अधिकार, राज्य निवडणूक आयोग, त्याची रचना, कार्ये व अधिकार यांचा बारकाईने आढावा घ्यायला हवा.

शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा त्यांचे प्रकार, निवडणूक, रचना, कार्ये, अधिकार या बाबी व्यवस्थित समजून घेऊन अभ्यास करावा.

७३वी व ७४वी घटनादुरुस्त्यांमधील तरतुदी, त्या अन्वये स्थापन केलेल्या समित्या, स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपवलेले विषय हे मुद्दे समजून घ्यावेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अभ्यासासाठी स्थापन केलेल्या समित्या/ आयोग यांचा अभ्यास आवश्यक आहे. या समित्यांकडून करण्यात आलेल्या शिफारशी, त्या अनुषंगाने घेण्यात आलेले निर्णय आणि त्यांची अंमलबजावणी यांचा नेमका अभ्यास करायला हवा.



न्यायमंडळ

न्यायमंडळाची रचना, एकात्मिक न्याय मंडळ आणि न्यायपालिकेची उतरंड याबाबतच्या घटनेतील तरतुदी माहीत करून घ्याव्यात. न्यायाधीशांच्या नेमणुका, महाभियोग, विशेषाधिकार समजून घ्यावेत.

सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भूमिका व अधिकार, कार्ये प्राथमिक, दुय्यम अधिकार क्षेत्रे समजून घ्यावीत. सांविधानिक आदेशाचे रक्षण करण्याची न्यायमंडळाची जबाबदारी माहीत करून घ्यावी.

दुय्यम न्यायालये, त्यातील न्यायाधीशांची नेमणूक, त्यांची अधिकारक्षेत्रे, विशेष न्यायालये याबाबत महत्त्वाच्या तरतुदी माहीत करून घ्याव्यात.

लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय, न्यायालयीन सक्रियता, जनहित याचिका या मुद्द्यांबाबत संकल्पनात्मक आणि अद्ययावत चालू घडामोडींच्या अनुषंगाने अभ्यास आवश्यक आहे.

नियोजन

प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा अभ्यास करताना योजनांची उद्दिष्टे, ध्येयवाक्ये, प्रतिमाने, सुरू झालेल्या विकास व कल्याणकारी योजना, राजकीय आयाम, कालावधी, ठळक निर्णय, मूल्यांकन यांचा आढावा घ्यायला हवा. निती आयोगाची रचना, कार्ये, प्रस्तावित योजना/ उद्दिष्टे यांचा आढावा घ्यायला हवा.

सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशांक म्हणजेच रोजगार, दारिद्र्य, भूक, मानवी विकास, व्यवसायसुलभता याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावरील भारताचे स्थान व राष्ट्रीय स्तरावरील महाराष्ट्राचे स्थान माहीत करून घ्यावे.

राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण यांचा अभ्यास करताना ७३वी व ७४व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना सोपविलेले अधिकार माहीत करून घ्यावेत.

भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवाक्षेत्राची रूपरेखा यांचा अभ्यास करताना अर्थव्यवस्था विषयाच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. त्याआधारे या उपघटकाची तयारी करता येईल.

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने, गरिबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल यांचा अभ्यास करताना आर्थिक व राजकीय अशा दोन्ही आयामांचा विचार करायला हवा. म्हणजेच याबाबतची आर्थिक पार्श्वभूमी आणि याबाबतचे शासकीय पातळीवरील प्रयत्न यांचा अभ्यास करायला हवा.

यूपीएससीची तयारी

भारताचे परराष्ट्र धोरण

प्रवीण चौगले

आजच्या लेखामध्ये सामान्य अध्ययन पेपर २ मधील आंतरराष्ट्रीय संबंध या अभ्यास घटका अंतर्गत भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेणार आहोत. सर्वप्रथम आपल्याला परराष्ट्र धोरण म्हणजे काय, हे समजून घेणे इष्ट ठरेल. देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी इतर देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखणे आवश्यक असते, असे संबंध विशिष्ट तत्त्वे आणि धोरणांवर आधारित असतात. अशा तत्त्वे व धोरणांना परराष्ट्र धोरण म्हणतात.

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करताना स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणातील सातत्य व बदलांचा आढावा घेणे आवश्यक ठरते. आंतरराष्ट्रीय संबंध किंवा परराष्ट्र धोरण हे अभ्यास घटक आज घडीला पुस्तकांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत या घटकांचा आपल्या दैनंदिन जीवनावरती प्रभाव पडत असतो. कारण जागतिकीकरणाच्या युगामध्ये जग हे खेडे बनले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे भौगोलिक सीमारेषा पुसट होत चाललेल्या आहेत. परिणामी, देशातील प्रत्येक नागरिकाचा या विषयांशी संबंध येतो. याचे सर्वांत उत्तम उदाहरण म्हणजे रशिया व युक्रेनमधील युद्ध.

भारताचे प्राचीन काळापासून जगातील इतर देशांशी संबंध सलोख्याचे राहिलेले आहेत. मात्र पारतंत्र्याच्या काळात ब्रिटिशांच्या वसाहतवादी हेतूने प्रेरित परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या इतर देशांशी असणाऱ्या संबंधांमध्ये बदल घडून आला. वास्तविक पाहता भारताच्या परराष्ट्र धोरणाची पायाभरणी ही स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली होती. ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांनी नेहमीच सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या तत्त्वांवर आधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यानंतर पहिले पंतप्रधान व परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार जवाहरलाल नेहरू यांनी परराष्ट्र धोरणाची बांधणी भारतीय तत्त्वे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील वास्तविकता यांचा मेळ साधून केली. त्यांनी अलिप्ततावाद, वसाहतवाद आणि साम्राज्यवादाला विरोध, वर्णद्वेष विरोध, जागतिक शांतता, प्रादेशिक सहकार्य आणि निःशस्त्रीकरणाला पाठिंबा या तत्त्वांचा परराष्ट्र धोरणामध्ये समावेश केला. अशाप्रकारे, प्रारंभीच्या काळात भारताने फक्त स्वतःचे हितसंबंध न जोपासता आपल्या परराष्ट्र धोरणातील तत्त्वानुसार आणि नेहरूंच्या विचारसरणीने जागतिक व्यवस्थेला आकार देण्याचासुद्धा प्रयत्न केला. स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरण निर्मितीवर पंतप्रधानांचा विशेष प्रभाव दिसून येतो.

पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या काळात पाकिस्तानशी युद्ध झाले. या युद्धात भारताने विजय मिळवला. परिणामी, चीनसोबत झालेल्या पराभवामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात गेलेली पत पुन्हा निर्माण झाली. शास्त्री यांच्यानंतर इंदिरा गांधी यांचा काळ परराष्ट्र धोरणातील वास्तववादाचा काळ म्हणून ओळखला जातो. वाढते लष्करी सामर्थ्य, वेगाने आकार घेत असलेला आण्विक कार्यक्रम, बांगलादेशाच्या निर्मितीतील भूमिका, शांततामय अण्वस्त्रप्रसार बंदी करारावर स्वाक्षरी करण्यास दिलेला नकार व सोव्हिएत रशिया यांच्यातील करार या त्यांच्या काळातील महत्त्वाच्या बाबीतून आदर्शवाद ते वास्तववाद हा बदल दिसून येतो. राजीव गांधी यांच्या काळात त्यांनी शेजारील देशांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कारकीर्दीत सार्कची स्थापना झाली. तसेच, १९८७ साली श्रीलंकेशी करार करून शांती सेना पाठवली गेली. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या कारकीर्दीत शीतयुद्धोत्तर जगातील बदलत्या राजकारणाचा परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडला. त्यांच्या काळामध्ये जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले गेले ज्यातून परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक मुद्दा कळीचा बनला. त्यांनी 'पूर्वेकडे पहा' हे धोरण स्वीकारून भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये पूर्वेकडील देशांना महत्त्व प्राप्त करून दिले.

अटलबिहारी वाजपेयी यांच्या कारकीर्दीमध्ये परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रीय हितसंबंधांना महत्त्व प्राप्त झाले. त्यांच्या काळात १९९८ साली दुसरी अणुचाचणी झाली त्यातून भारत हा अण्वस्त्रधारी देश आहे अशी जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा निर्माण झाली. वाजपेयी यांच्या काळात कारगिल युद्ध घडून आले ज्यामध्ये पुन्हा एकदा पाकिस्तानचा पराभव झाला. असे असले तरी त्यांनी पाकिस्तानशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळामध्ये ह्यपूर्वेकडे पहाह्ण या धोरणावर अति भर दिला गेला. २००५ साली भारत व अमेरिका यांच्यामध्ये नागरी अणुकरार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले व २००८ साली हा अणुकरार घडून आला. यामुळे भारताची प्रतिमा जागतिक स्तरावर उंचावली. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून दहशतवाद हा मुद्दा आंतरराष्ट्रीय स्तरावर कळीचा बनवला. २०१४ साली नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यावर त्यांच्या परराष्ट्र धोरणामध्ये दक्षिण आशियायी राष्ट्रांना प्रथम स्थान दिल्याचे आढळते. त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षा या विषयांशी निगडित पदांचा भार या क्षेत्रातील तज्ज्ञ नोकरशहांकडे दिला आहे.

यावरून नरेंद्र मोदी यांच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण व राजनय हे महत्त्वपूर्ण विषय आहेत हे सिद्ध होते. त्यांनी यूपीए सरकारची बरीच धोरणे पुढे सुरू ठेवली. पूर्वीच्या लूक ईस्ट पॉलिसीऐवजी 'ॲक्ट ईस्ट धोरण' व 'लूक वेस्ट' धोरणाचे सूतोवाच केले आहे. मोदी यांच्या परराष्ट्र धोरणामध्ये व्यापाराबरोबरच सुरक्षा, संस्कृती, भू-राजकीय व भू-सामरिक मुद्द्यांना प्राथमिकता दिलेली आहे. परराष्ट्र धोरणाच्या समग्र आकलनासाठी एनबीटी प्रकाशनाचे इंडियन फॉरेन पॉलिसी सिन्स इंडिपेंडन्स हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. त्याबरोबरच पॅक्सइंडिका - शशी थरूर, ह्यवर्ल्ड फोकसह्ण या नियतकालिकाबरोबरच वृत्तपत्रांमधील परराष्ट्र धोरणविषयक लेख नियमितपणे पाहणे आवश्यक आहे.

शब्दकोडे- ७६६

सुडोकू - ७६६

एमपीएससी मंत्र

रोहिणी शहा

राज्य कर निरीक्षक पदनिहाय पेपरची तयारी

दुय्यम सेवा परीक्षेच्या पदनिहाय पेपरमधील सामायिक अभ्यासक्रमाच्या तयारीबाबत मागील काही लेखांमध्ये चर्चा करण्यात आली. या लेखामध्ये राज्य कर निरीक्षक पदाच्या पदनिहाय अभ्यासक्रमाच्या तयारीबाबत चर्चा करू.

नियोजन प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा अभ्यास करताना योजनांची उद्दिष्टे, ध्येयवाक्ये, प्रतिमाने, सुरू झालेल्या विकास व कल्याणकारी योजना, राजकीय आयाम, कालावधी, ठळक निर्णय, मूल्यांकन यांचा आढावा घ्यायला हवा. निती आयोगाची रचना, कार्ये, प्रस्तावित योजना / उद्दिष्टे यांचा आढावा घ्यायला हवा.

सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशांक म्हणजेच रोजगार, दारिद्र्य, भूक, मानवी विकास, व्यवसाय सुलभता याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावरील भारताचे स्थान व राष्ट्रीय स्तरावरील महाराष्ट्राचे स्थान माहीत करून घ्यावे. राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण यांचा अभ्यास करताना ७३वी व ७४वी घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना सोपविलेले अधिकार माहीत करून घ्यावेत.

भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवाक्षेत्राची रूपरेखा यांचा अभ्यास करताना अर्थव्यवस्था विषयाच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. त्या आधारे या उपघटकाची तयारी करता येईल.

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने, गरिबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल यांचा अभ्यास करताना आर्थिक व राजकीय अशा दोन्ही आयामांचा विचार करायला हवा. म्हणजेच याबाबतची आर्थिक पार्श्वभूमी आणि याबाबतचे शासकीय पातळीवरील प्रयत्न यांचा अभ्यास करायला हवा.

शहरी व ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास

ऊर्जा, पाणीपुरवठा, मलनिःसारण, गृह, परिवहन (रस्ते, बंदर इत्यादी), दळणवळण (पोस्ट, तार व दूरसंचार), रेडिओ, टीव्ही, इंटरनेट या पायाभूत सुविधांचे आर्थिक विकास आणि सामाजिक अभिसरण यातील योगदान आणि भारतातील त्यांच्या विकास व विस्ताराचे टप्पे व त्यासाठीचे प्रयत्न यांचा आढावा घेणे आवश्यक आहे. याबाबत ग्रामीण व शहरी भागातील परिवहन व गृह या विषयीचे प्रश्न व त्यावरील केंद्र व राज्य सरकारचे कार्यक्रम व उपक्रमशीलता यांवर विशेष भर द्यायला हवा.

तसेच भारतातील इन्फ्रास्ट्रक्चर सुविधांमधील प्रादेशिक असमतोल, गुंतवणूक, दर्जा व इतर समस्यांचा बारकाईने अभ्यास करावा. इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे पर्याय म्हणून खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारी, एफ डी आय., खासगीकरण या धोरणांमागची भूमिका व त्यातील तरतूदी समजून घ्याव्यात.

राज्य व केंद्र सरकारची वेगवेगळ्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठीची धोरणे समजून घ्यावीत तसेच याबाबत चालू घडामोडी माहीत असायला हव्यात.

आर्थिक सुधारणा व कायदे

पार्श्वभूमी, उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरण संकल्पना व त्याचा अर्थ आणि व्याप्ती, मर्यादा यांचा संकल्पनात्मक आणि विश्लेषणात्मक अभ्यास आवश्यक आहे.

केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणांचे टप्पे व त्यांचे परिणाम यांचा आढावा घ्यायला हवा.

WTO तरतूदी आणि सुधारणा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित परिणाम, प्रश्न व समस्या, आणि त्याबाबतच्या चालू घडामोडी समजून घेणे आवश्यक आहे.

GST, विक्री कर, VAT, WTO इत्यादीशी संबंधित कायदे व नियम मुळातून वाचणे जास्त व्यवहार्य आहे. यातील ठळक तरतुदी माहीत असायलाच हव्यात.

आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय भांडवल चळवळ

जागतिकीकरणाच्या युगातील सूत्र व काल, वाढ, रचना या संकल्पना व्यवस्थित समजून घ्याव्यात. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा, निर्यातीतील वाढ या बाबींची आकडेवारी आर्थिक पाहणी अहवालातून अद्ययावत करून घ्यावी.

भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण, WTO आणि आंतरराष्ट्रीय व्यापार विदेशी भांडवलाचा अंतःप्रवाह, रचना व वाढ यातील महत्त्वाचे टप्पे समजून घ्यावेत. तसेच चालू घडामोडी माहीत करून घ्याव्यात.

प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक (FDI) व्यापार त्याबाबतचे शासकीय धोरण समजून घ्यावे. बहुराष्ट्रीय भांडवल पुरविणाऱ्या संस्था, IMF जागतिक बँक, IDA इंटरनॅशनल क्रेडिट रेटिंग या संस्थांचे कार्य, महत्त्वाचे नियम / ठराव, सदस्य, यातील भारताची भूमिका / योगदान समजून घ्यावे.

सार्वजनिक वित्तव्यवस्था

कर आणि करेतर महसुलाचे स्रोत, केंद्र व राज्य सार्वजनिक खर्च या संकल्पना समजणे आवश्यक आहे.

केंद्र व राज्यातील सार्वजनिक ऋण, सार्वजनिक खर्च वाढ यांची कारणे समजून घ्यावीत. सार्वजनिक खर्च सुधारणा कामावर आधारित अर्थसंकल्प, शून्याधारित अर्थसंकल्प, वित्तीय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन कायद्यातील तरतूदी माहीत असायला हव्यात.

भारतातील केंद्र व राज्य पातळीवरील कर सुधारणांचा आढावा महत्त्वाचे टप्पे, त्यांची पार्श्वभूमी, कारणे, स्वरूप, परिणाम, यशापयश या मुद्द्यांच्या आधारे घ्यावा.

सार्वजनिक ऋणवाढ, रचना आणि भार, राज्याच्या कर्जबाजारीपणाची केंद्राला समस्या, या बाबी विश्लेषणात्मक प्रश्नांसाठी तयार कराव्या. त्यासाठी संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

राजकोषीय तूट, संकल्पना, तूटीचे नियंत्रण या संकल्पना समजून घ्याव्यात. तूट नियंत्रणासाठीचे केंद्र, राज्य व रिझर्व्ह बँकेचे उपक्रम, केंद्र आणि राज्यस्तरावरील राजकोषीय सुधारणा यांचा आढावा घ्यायला हवा.

भारत आणि शेजारील देश

यूपीएससीची तयारी

प्रवीण चौगले

आजच्या लेखामध्ये यूपीएससी मुख्य परीक्षेतील सामान्य अध्ययन पेपर २ अंतर्गत महत्त्वाचा मुद्दा भारत व शेजारील देश यांच्यातील संबंधांचा आढावा घेणार आहोत. यामध्ये चीन, म्यानमार, अफगाणिस्तान, बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, भूतान आणि मालदीव यांचा समावेश होतो. या घटकाचा अभ्यास करताना या देशांची वैशिष्ट्ये त्यांच्यातील परस्परसंबंध, बहुपक्षीय संबंध, त्यांच्यावरील अंतर्गत व बाह्य दबाव टाकणारे घटक, जागतिक आंतरराष्ट्रीय राजकारणातील त्यांचे स्थान या बाबी जाणून घेणे आवश्यक ठरते. भारताचे शेजारील देशांशी संबंध आरंभापासूनच समानता व परस्परांचा आदर या मूलभूत तत्त्वावर आधारित आहेत. या घटकाची तयारी समकालीन परिप्रेक्ष्यात करणे आवश्यक ठरते.



भारत-चीन संबंध

भारत व चीनमधील द्विपक्षीय संबंधांमध्ये स्पर्धा व सहकार्य या दोन्ही पैलूंचा समावेश होतो. या संबंधांमध्ये धोरणात्मक अविश्वास हे आव्हान दिसून येते. सीमापार नद्यांच्या पाण्याचा वापर, व्यापार असमतोल, सीमा प्रश्न इत्यादी द्विपक्षीय मुद्दे दिसून येतात. चीन हा देश आर्थिक व लष्करी महासत्ता म्हणून उदयास आलेला आहे. चीनने आपल्या आर्थिक सामर्थ्यांच्या साहाय्याने दक्षिण आशियाई राष्ट्रांवर आपला प्रभाव स्थापन करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. चीनच्या या दृष्टिकोनाचा भारतावरती परिणाम दिसून येतो.

Q. The newly tination partnership AUKUS is aimed at countering China's ambitions in the Indi- Pacific region. Is it going to supersede the existing partnerships in the region? Discuss the streangth and impact of AUKUS in the present scenario. (२०२१).

भारत-पाकिस्तान संबंध

१९४७ पासून भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध आजवर तणावपूर्ण राहिलेले आहेत. १९४७, १९६५, १९७१ आणि १९९९ अशी भारत आणि पाकिस्तान यांमध्ये युद्धे झाली आहेत. सद्य:स्थितीमध्ये पाकिस्तानची चीनशी अधिक जवळीक असल्यामुळे भारताच्या या चिंतेमध्ये वाढ झालेली आहे. भारताने जम्मू-काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा काढला. त्यानंतर पाकिस्तानने यावर तीव्र आक्षेप घेत संयुक्त राष्ट्रात धाव घेतली.

भारत-बांगलादेश संबंध

बांगलादेशच्या स्वातंत्र्यामध्ये भारताने कळीची भूमिका बजावली होती. त्यानंतर बांगलादेशचे पहिले अध्यक्ष शेख मुजीब उर रहमान यांच्यानंतर भारत-बांगलादेश संबंध बिघडले होते. सध्या भारत आणि बांगलादेश यांच्यातील १९७४ असून प्रलंबित असणारा भू-सीमा रेषा करार पूर्णत्वास गेला आहे. तसेच हा दोन्ही देशांतील भूखंडांच्या अदलाबदलीचा क्लिष्ट मुद्दा, तिस्ता नदीच्या पाणीवाटपातील वाद या समस्यांचे निराकरण झाल्याने दोन्ही देशांतील संबंध मैत्रीपूर्ण बनले आहेत. अलीकडे आसाममध्ये बेकायदेशीर वास्तव्यास असणाऱ्या बांगलादेशी स्थलांतरित लोकांची ओळख पटविण्यासाठी लागू करण्यात आलेला नागरिकत्व सुधारणा कायदा आणि

राष्ट्रीय नागरिक नोंदणी या उपक्रमांमुळे या संबंधांमध्ये किंचित तणाव जाणवतो.

भारत-म्यानमार संबंध

म्यानमारमध्ये १९६२ साली झालेल्या लष्करी उठावानंतर त्या देशाने जगापासून अलिप्त राहण्याचे धोरण स्वीकारले होते. परिणामी, भारत आणि म्यानमार संबंध थंडावले होते. नंतर १९९०च्या दशकामध्ये भारताने म्यानमारमधील नेत्या आंग सान सूची यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीवादी चळवळीला पाठिंबा दिला होता. ईशान्येकडील अनेक बंडखोर गटांचा बीमोड करण्यासाठी म्यानमारने भारताला पाठिंबा दिला.

भारत-श्रीलंका संबंध

श्रीलंकेतील संघर्ष संपून तेथे लोकशाही मजबूत करण्यासाठी भारताने शांतिसेना पाठविली होती. राजपक्षे यांच्या कार्यकाळात भारत-श्रीलंका संबंध तणावपूर्ण होते. कारण त्या काळात श्रीलंकेवर चीनचा प्रभाव वाढत होता. मात्र, सिरीसेना यांचा चीनचे वर्चस्व झुगारून देण्याचा आणि भारतशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याकडे कल असल्याचा दिसतो. या दोन्ही देशांमध्ये झालेला नागरी अणुकरार अतिशय महत्त्वाचा आहे.

भारत-नेपाळ संबंध

अलीकडे नेपाळने एक नवा राजकीय नकाशा प्रसिद्ध केला होता त्यामध्ये उत्तराखंडमधील कालापणी लीपूल्लेख ही गावे नेपाळचा भाग असल्याचे दाखवले होते. भारताने यावर तीव्र आक्षेप घेतला. भारत आणि चीनला जोडणाऱ्या रस्त्याचे भारताने उद्घाटन केले. मात्र, ज्या भागात हा रस्ता उभारण्यात आला तो नेपाळचा आहे, असा नेपाळकडून दावा करण्यात आला. त्यानंतर सदर नकाशा प्रसिद्ध करण्यात आला. दोन्ही देशांमधील समान सांस्कृतिक वारसा, खुली सीमा तसेच पर्यटन स्थळ म्हणून नेपाळ नेहमीच भारतासाठी आकर्षण राहिलेले आहे. मात्र नेपाळमध्ये भारतविरोधी भावनांचा अंतःप्रवाह अजूनही जाणवतो.

भारत-मालदीव संबंध

भारत आणि मालदीव यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध आहेत. भारत हा मालदीवचा जवळचा द्विपक्षी भागीदार देश आहे. मालदीव महत्त्वाच्या वस्तूंच्या पुरवठ्यासाठी भारतावर अवलंबून आहे. तसेच मालदीवचे लोक वैद्यकीय उपचारासाठीही भारतामध्ये येतात. भारतीयांमध्ये पर्यटनासाठी मालदीवला प्राधान्य दिले. अलीकडे मालदीव येथील चीनचा वावर भारतासाठी चिंतेची बाब आहे. मालदीवने चीनसोबत फ्री ट्रेड ॲग्रीमेंट केले आहे. हा करार भारतासाठी धक्कादायक आहे. मालदीव येथील विरोधी पक्षनेते अब्दुल्ला यामीन हे भारतविरोधक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या पुढाकाराने सध्या मालदीव येथे 'इंडिया आऊट' मोहीम सुरू आहे. मात्र मालदीवचे अध्यक्ष सोलेह यांनी 'इंडिया फर्स्ट' या धोरणाचा पुरस्कार केला आहे. तसेच 'इंडिया आऊट' या मोहिमेला पायबंध घालण्यासाठी त्यांच्या सरकारने पावले उचलली आहेत.

हा घटक चालू घडामोडींशी संबंधित असल्याने तयारीसाठी 'इंडियन एक्स्प्रेस'सारख्या वर्तमानपत्रांसोबत 'वर्ल्ड फोकस' हे नियतकालिक वापरता येईल. याबरोबरच परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे संकेतस्थळ आणि वार्षिक अहवाल पाहणे श्रेयस्कर ठरेल.

लोकसत्ता Thu, 30 June 2022
https://epaper.loksatta.com/c/68896670